दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३६८ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

## उपमुख्यमंत्री फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिम, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे कामठी येथून निवडणूक लढवणार

**मुंबई (वृत्तसंस्था)-रविवारी भाजपने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात ९९ नावे आहेत. १३ जागांवर महिलांना तिकीट देण्यात आले आहे. ६ जागा एसटीसाठी आणि ४ जागा एससीसाठी आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दक्षिण पश्चिम नागपूरमधून निवडणूक लढवणार आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना भोकर विधानसभेतून उमेदवारी देण्यात आली आहे.विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना कुलाब्यातून तर नितीश राणे यांना कणकवलीतून तिकीट मिळाले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या आमदारांचे सदस्यत्व रद्द न केल्याने नार्वेकर विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. नितेश राणे सध्या मुस्लिमविरोधी वक्तव्यामुळे वादात सापडले आहेत.महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. नांदेड लोकसभा जागेवरही २० नोव्हेंबरला पोटनिवडणूक होणार आहे. त्या जागेसाठी भाजपने अद्याप उमेदवार जाहीर केला नाही.**

दरम्यान, राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयोगाकडून राज्यात निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर सर्व पक्षांची जोरदार तयार सुरू केली आहे. कोणत्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळणार याची चर्चा होती. अखेर भाजपने त्यांची पहिली ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.महायुतीतील जागावाटपाची स्थिती काय? उमेदवारांची यादी कधी येणार?



## कोणा-कोणाला संधी,पाहा संपूर्ण यादी


चंद्रशेखर बावनकुळे- कामठी
देवेंद्र फडणवीस- नागपूर दक्षिण पश्चिम
राजेश पाडवी- शहादा
विजयकुमार गावीत- नंदुरबार
अनुप अग्रवाल- धुळे शहर
जयकुमार रावल- सिंदखेडा
काशीराम पावरा- शिरपुर
अमोल जावळे - रावेर
संजय सावकारे- भुसावळ
सुरेश भोळे- जळगाव शहर
मंगेश चव्हाण- चाळीसगाव
गिरीश महाजन- जामनेर
श्वेता महाले- चिखली
आकाश फुंडकर- खामगाव
संजय कुटे- जळगाव
रणधीर सावरकर- अकोला पूर्व
प्रताद अडसद- धामणगाव रेल्वे
प्रवीण तायडे- अचलपूर
राजेश बकाणे- देवळी
समीर कुणावार- हिंगणघाट
पंकज भोयर- वर्धा
समीर मेघे- हिंगणा
मोहन मते- नागपूर दक्षिण
कृष्णा खोपडे- नागपूर पूर्व
विजय रहांगडाले- तिरोरा
विनोद अग्रवाल- गोंदिया
संजय पुरम- अमगाव
कृष्णा गजबे- आरमोरी
सुधीर मुनगंटीवार- बल्लारपूर
बंटी भांगडिया- चिमूर
संजीवरेड्डी बोडकुरवार- वणी
अशोक उडके- राळेगाव
मदन येरवार- यवतमाळ
भीमराव केरम- किनवट
श्रीजया चव्हाण- भोकर
राजेश पवार-नायगाव
तुषार राठोड- मुखेड
तानाजी मुटकुले-हिंगोली
मेघना बोर्डीकर- जिंतूर
बबनराव लोणीकर- परतूर
नारायण कुचे- बदनापूर
संतोष दानवे- भोकरदन
अनुराधा चव्हाण- फुलंब्री
अतुल सावे- संभाजीनगर पूर्व
प्रशांत बंब- गंगापूर
दिलीप बोरसे- बागलाण
राहुल आहेर- चांदवड
राहुल ढिकले- नाशिक पूर्व
सीमा हिरे- नाशिक पश्चिम
राहुल कुल- दौंड
शंकर जगताप- चिंचवड
महेश लांडगे- भोसरी
सिद्धार्थ शिरोळे- शिवाजीनगर
चंद्रकांत पाटील- कोथरूड
माधुरी मिसाळ- पर्वती
राधाकृष्ण विखे पाटील- शिर्डी
मानिक राजले- शेवगाव
शिवाजीराव कर्डिले- राहुरी
प्रतिभा पाचपुते- श्रीगोंदा
राम शिंदे- कर्जत जामखेड
नमिता मुंदडा- केज
संभाजी पाटील निलंगेकर- निलंगा
अभिमन्यु पवार- औसा
राणाजगतसिंह पाटील- तुळजापूर
विजयकुमार देशमुख- सोलापूर शहर
सचिन कल्याणशेट्टी - अक्कलकोट
सुभाष देशमुख- सोलापूर दक्षिण
जयुमार गोरे- माण
अतुल भोसले- कराड दक्षिण
शिवेंद्रराजे भोसले- सातारा
नितेश राणे- कणकवली
अमल महाडिक- कोल्हापूर दक्षिण
राहुल आवाडे- इचलकरंजी
सुरेश खाडे- मीरज
सुधीर गाडगीळ- सांगली

# बस व दुचाकीच्या धडकेत युवक ठार

## वरोरा-चिमूर महामार्ग ३५३ ई वरील घटना

### चार तास वाहतूक ठप्प,टायर जाळून जमावाचा निषेध,दंगा नियंत्रक पथकाची एन्ट्री







**वरोरा । प्रतिनिधी**

आज सकाळी ७ वाजता वरोरा-चिमूर राष्ट्रीय महामार्ग ३५३ ई वरील भेंडाळा पाटीजवळ दुचाकी आणि एसटी बसमध्ये झालेल्या भीषण अपघातात १५ वर्षीय सृजन राजू साळवे जागीच ठार झाला. या घटनेमुळे संतप्त जमावाने महामार्गावर रस्ता रोको करत टायर जाळून निषेध नोंदवला, ज्यामुळे जवळपास चार तास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

प्राप्त माहितीनुसार, रविवारची सुट्टी असल्याने सृजन आपल्या एमएच ३४ बीएस ९४४६ क्रमांकाच्या बजाज सिटी १०० दुचाकीवरून शेताकडे जात होता. महामार्ग ओलांडत असताना चिमूर आगाराची बस (एमएच ४० बीएल ३९८८) भरधाव वेगात आल्याने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की सृजन थेट बसच्या काचेला आपटला, तर त्याची दुचाकी बसखाली अडकून १०० मीटरपर्यंत फरफटत गेली.

अपघातानंतर गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत रस्ता रोको केला. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मृतकाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि गावातून महामार्गाला जोडणारा रस्ता द्यावा, या मागण्या पूर्ण होईपर्यंत मृतदेह न उचलण्याचा ठाम पवित्रा त्यांनी घेतला. प्राथमिक हस्तक्षेप शेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने करण्याचा प्रयत्न केला, मात्र जमावाने आपली भूमिका कायम ठेवली. चिमूरचे पोलीस उपनिरीक्षक राकेश जाधव यांच्यासह अधिकाऱ्यांनीही मध्यस्थीचा प्रयत्न केला, पण तोडगा न निघाल्याने संतप्त वातावरण टिकून राहिले. चार तासांनंतरही परिस्थिती नियंत्रित होत नसल्याने चंद्रपूरच्या दंगा नियंत्रक पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. दरम्यान, एसटी बसचा चालक पोलिस ठाण्यात हजर झाला आहे. बातमी लिहिपर्यंत जमाव आपल्याच मागण्यांवर ठाम होता, आणि महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी ठप्पच होती.

## बिबट्याची झडप चिमुकल्यावर

# आईच्या डोळ्या समोरून नेले उचलून

**पुणे । प्रतिनिधी**

मांडवगण फराटा येथे रात्री दुःखदायी घटना घडली आहे. ही घटना गावापासून सव्वादोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गूळ तयार करण्याच्या गुऱ्हाळावर घडली आहे.

हे गाव शेतीप्रधान आहे, जिथे बाराही महिने नदीचे पाणी उपलब्ध असते. यामुळे गावाचा व्यवसाय मुख्यतः शेतीवर आधारित आहे, आणि त्याला जोडधंदा म्हणून दूध, छोटे-मोठे व्यवसाय व ऊसापासून गूळ तयार करणे हेसुद्धा व्यापारी उपक्रम आहेत. यासाठी लोक बाहेरून कामासाठी येतात, विशेषतः यूपी, राजस्थान आणि बिहार भागातील. गावात शाळा आणि मोठे विद्यालय असल्यामुळे येथे मोठी वर्दळ असते. मांडवगण फराटा येथील दगडवाडी रोडवरील गोकुळनगर येथे संदीप अशोक घाडगे यांच्या गुऱ्हाळात ही घटना घडली. येथे काम करण्यासाठी अनेक कामगार आहेत, त्यात राजकुमार सिंग व त्याची पत्नी रेखा हे जोडपे देखील आहेत. यामध्ये किरकोळ घरगुती कारणांवरून भांडण झाले, ज्यामुळे पत्नी रुसून बाहेर पडली. आईच्या पाठीमागे तिचा लहान मुलगा वन्स (वय ७) चालत होता. अचानक ऊसात लपलेला बिबट्या वन्सवर झडप घालतो, आणि त्याने मुलाची मान पकडून घेऊन जाऊ लागला. आईने हे पाहताच ओरडली, पण बिबट्या वन्सला घेऊन ऊसात जवळजवळ




आर्धा किलोमीटरपर्यंत गेला.

या घटनेच्या वेळी तिथे उपस्थित कामगार, ऊसतोड कामगार आणि इतर लोक तात्काळ जमा झाले. रात्री ९:४५ च्या सुमारास घडलेल्या या घटनेची माहिती पोलिस व वनविभागाला देण्यात आली.बिबट्याने घेतलेल्या वन्सला काही वेळातच शोधण्यात आले, पण त्याला दवाखान्यात घेऊन जाताना त्याच्या मृत्यूची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचे अधिकारी व ग्रामस्थांनी बैठक घेतली. बिबट्याला पकडण्यासाठी पथकांनी सीसीटीव्ही लावले, आणि काही ठिकाणी पिंजरेही लावण्यात आले. गावातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे की, हिरवळ शेतीचा भाग असल्याने, जर असे घडत असेल तर त्यांना काम करणे शक्य होणार नाही. त्यामुळे त्यांनी अधिक सुरक्षा व उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## झाडगावात वाघाची दहशत शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण



**वर्धा । प्रतिनिधी**

झाडगावच्या शिवरात विलास अवचट यांच्या शेतात वाघाने गाईच्या दोन बछड्यांचा शिकार केला, ज्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाची उपस्थिति गावात लक्षात घेता, शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर वन विभागाने देखील गंभीरता ओळखून शेतकऱ्यांना संरक्षणासाठी उपाययोजना करण्याची सूचना दिली आहे. वाघाच्या दहशतीमुळे गावकऱ्यांची चिंता वाढली असून, संबंधित यंत्रणांनी त्वरित पावले उचलण्याची आवश्यकता आहे.गावातील शांतता कायम राखण्यासाठी वाघाचा समावेश असलेल्या क्षेत्रांमध्ये जनावरांची देखरेख अधिक कडक करण्यावर विचार सुरू आहे. शेतकऱ्यांनी वाघाच्या हालचालींची माहिती स्थानिक वनाधिकाऱ्यांना देण्याचे ठरवले आहे, जेणेकरून यापुढे अशा घटनांना आळा घालता येईल. गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आणि जनावरांच्या संरक्षणासाठी वन विभागाने योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा गावात असुरक्षिततेची भावना वाढत जाईल.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात दहावी अटक

# बेड्या ठोकलेला भगवंत सिंग हत्यारे घेऊन उदयपूरहून मुंबईत आला

**मुंबई । मनोज उतेकर**

माजी मंत्री बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात मुंबई पोलिसांनी दहाव्या आरोपीला अटक केली आहे. आरोपी भगवंत सिंगला बेलापूर, नवी मुंबई परिसरातून अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, भगवंत सिंग उदयपूरहून मुंबईत एका अन्य आरोपीसह शस्त्रे घेऊन आला होता.

भगवंत सिंग सुरुवातीपासून शूटर्स आणि कट रचणाऱ्यांच्या संपर्कात होता. मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रँचचे १५ पथक वेगवेगळ्या अँगलने या प्रकरणाचा तपास करत आहेत. एक दिवस अगोदर म्हणजेच १९ ऑक्टोबर रोजी पाच आरोपींना अटक करण्यात आली होती. या पाच आरोपींमध्ये नितीन सप्रे, रामफुलचंद कनोजिया, संभाजी किशोर पारधी, प्रदीप दत्तू ठोंबरे आणि चेतन पारधी यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी मुख्य सूत्रधार शुभम लोणकर आणि सूत्रधार मोहम्मद जीशान अख्तर यांच्या संपर्कात होते, परंतु दोघेही अद्याप फरार आहेत. न्यायालयाने या सर्व आरोपींना २५




ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

१२ ऑक्टोबरच्या रात्री, बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झीशानच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई गँगने या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांनी बाबांच्या हत्येमागे बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानला जबाबदार धरले आहे. यामुळे सलमान खानला ईमेलद्वारे जीवे मारण्याच्या धमक्या आल्याचे समजते.मुंबई पोलिसांच्या माहितीनुसार, नितीन गौतम सप्रे आणि फूलचंद कनोजिया हे या हत्याकांडाच्या मॉड्यूलचे प्रमुख सदस्य आहेत. सिद्दीकी यांच्या हत्येसाठी वापरली गेलेली शस्त्रे या मॉड्यूलने नेमबाजांना पुरवली होती, ज्यात विदेशी बनावटीचे टिसास-ग्लॉक आणि देशी बनावटीचे पिस्तूल समाविष्ट आहेत. या शस्त्रांचा उपयोग उत्तर भारतातून करण्यात आला होता.

अटक करण्यात आलेला नितीन गौतम सप्रे हा हिस्ट्रीशीटर आहे, जो २०१५ मध्ये एका खुनाच्या गुन्ह्यात सामील होता. त्याच्यावर खुनाचा प्रयत्न आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या गुन्ह्यातही आरोप आहेत. फुलचंद कनोजिया देखील हिस्ट्रीशीटर आहे. फरार आरोपींवर लुकआउट नोटीस जारी करण्यात आली आहे, ज्यात गँगस्टर शुभम लोणकर आणि मास्टरमाईंड मोहम्मद जीशान अख्तर यांचा समावेश आहे. पोलिस यापूर्वी अटक केलेल्या आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लावण्याची शक्यता देखील तपासत आहेत. या प्रकरणात अनेक दृष्ये उलगडत असून, पोलिसांचा तपास सुरु आहे.

# पाथरी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४-साठी ४१५ मतदान केंद्रांची निर्मिती

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**

पाथरी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पाथरी विधानसभा मतदार संघात एकूण ४१५ मतदार केंद्रावर मतदानाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शहरी भागात ७० मतदान केंद्र असून ग्रामीण भागातील ३४५ मतदान केंद्रांचा समावेश आहे . त्यात तालुकानिहाय मतदान केंद्र पाथरी तालुका १२२ मतदान केंद्र,मानवत तालुका १०५ मतदान केंद्र,सोनपेठ तालुक्यातील ८३ मतदान केंद्र, व परभणी ग्रामीण १०६ मतदान केंद्रांचा समावेश आहे.पाथरी विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्र क्रमांक २५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोली क्रमांक १ शेवडी तालुका मानवत या एका केंद्रास संवेदनशील केंद्र म्हणून प्रशासनाने घोषित केले आहे. शहरी भागातील एकूण ७३ मतदान केंद्र ही पर्दानशीन मतदान केंद्र म्हणून घोषित केले आहे. त्यात पाथरी येथील २० मतदान केंद्र,मानवत १५ केंद्र, सोनपेठ १५ केन्द्र व परभणी ग्रामीण २८ मतदान केंद्रांचा समावेश आहे या मतदान केंद्रांवर किमान एक महिला कर्मचारी ची मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार. पाथरी विधानसभा मतदारसंघात मतदारांचे संख्या पुरुष मतदार २ लाख १ हजार ८२४ स्त्री १लाख ८८ हजार ७०० तर २१ तृतीय पंथी दोन एकूणमतदार ३ लाख ९० हजार ५४७ अशी नोंदझालेली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री शैलेश लाहोटी यांनी दिली . त्यांना सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पांडुरंग माचेवाड तहसीलदार मानवत, शंकर हांदेशवार तहसीलदार पाथरी,महाजन नायब तहसीलदार पाथरी इत्यादी निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थित होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.निवडणूक कार्यक्रम पुढील प्रमाणे राहणार आहे.




१.निवडणूक अधिसूचना जारी करणे
२२ ऑक्टोबर २०२४

२.नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची शेवटची तारीख
२९ ऑक्टोबर २०२४

३. नामनिर्देशनपत्रची छाननी
३० ऑक्टोबर २०२४

४. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख-४ नोव्हेंबर २०२४

५. मतदानाचा दिनांक
२० नोव्हेंबर २०२४


६. मतमोजणीचा-दिनांक.
२३ नोव्हेंबर २०२४


# करमाळा मतदारसंघात एकच लाडू कुणाला वाढू?

करमाळा-माढा विधानसभा निवडणुकीत इच्छुकांची बाहुगर्दी झाली असली तरी सर्वांना संधी मिळेल असे नाही. करमाळा, हा आजवर कुणालाही अंदाज न आलेला तालुका आहे. या तालुक्यात अनेक बडे नेते वरच्या पदावर गेले आहेत. त्या वेळची परिस्थिती 'राजा बोले, दल हाले' अशी होती. पण आजच्या परिस्थितीला 'हे जगच धावते' असे म्हणणे अधिक योग्य ठरते.

आजच्या फास्ट जगात मतदारही तीच गती धरत चालला आहे. नेते मंडळीही मागे राहिलेले नाहीत; त्यांनी दररोजची अपडेट्स सोशल मिडियावर टाकण्यासाठी खास लोकांची नियुक्ती केली आहे. तथापि, तालुक्यातून एकच आमदार आणि मतदारांना एकच मतदान अधिकार असल्यामुळे एकच लाडू कुणाला वाढू अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे, मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायत सारखे झाडून मतदान होईल, अशी अपेक्षा आहे.

यंदा संजय शिंदे, नारायणराव पाटील, प्रा. रामदास झोळ, दिग्विजय बागल, महेश चिवटे, प्रतापराव जगताप, सुनिल सावंत, आणि शंभूराजे जगताप यासारख्या नेत्यांनी


मा.आ.श्री नारायणराव पाटील


प्रा.रामदास झोळ


संजय शिंदे

**प्रा.राजेश गायकवाड**
**उपसंपादक,सोलापूर**

आमदारकीच्या भावनांचा इशारा दिला आहे. यामुळे, येणारा विजयी उमेदवार हा केवळ हजाराच्या फरकाने येईल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रत्येक नेत्याने आपली भूमिका आणि केलेली विकास कामे याच्या जोरावर मतदारांच्या दारात जाणार आहेत. मात्र, तालुक्यातील जनतेच्या अपेक्षा यावेळी वेगळ्या आहेत. संजय शिंदे अपक्ष म्हणून लढणार असल्याने, त्यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या ३००० कोटींच्या विकासकामांचा विचार केला तर ३९००० मतदान त्यांना मिळवले आहे.

नारायणराव पाटील यांची कारकीर्द देखील प्रभावी असून, त्यांना 'रोड किंग', 'पाणीदार', 'दमदार आमदार' अशा पदव्या मिळालेल्या आहेत. शिक्षण, आरोग्य व रोजगार या त्रिसुत्रीवर प्रा. रामदास झोळ यांचाही प्रभावी ठसा आहे.

त्यामुळे, मतदार राजा नक्की काय करणार याकडे जिल्ह्यातील व राज्यातील नेते मंडळींचे लक्ष लागलेले आहे.

# स्टेट बँकेच्या हदगाव शाखेतून विमाधारकाला दोन लाख रुपये

**हदगाव । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत फक्त ४३६ रुपये भरून विमा काढलेल्या राजू दत्तराव पाईकराव, वय ३७, निवासी निवघा यांचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबीयांना या विमा योजनेअंतर्गत दोन लाख रुपये बँकेकडून देण्यात आले.

धकाधकीच्या जीवनात कधी काय दुर्घटना घडेल, याचा नेम नसतो. कोणाचा अचानक मृत्यू होईल हे सांगता येत नाही. यामुळे विमा संरक्षण मिळावे यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय) आणली आहे. या योजनेअंतर्गत ४३६ रुपये भरून विमा काढला जातो.

आतापर्यंत स्टेट बँक ऑफ इंडियाच्या हदगाव शाखेतून अनेक जणांनी या प्रकारचा विमा उतरवला आहे. विमाधारक व्यक्तीचा कोणत्याही कारणांमुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबाला २ लाख रुपये मिळतात. हदगाव शाखेने याच पद्धतीने मृत्यू झालेल्या अनेक विमाधारकांच्या कुटुंबीयांना संरक्षित रक्कम वितरित केली आहे. नुकतेच निवघा येथील खातेदार राजू पाईकराव यांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबाला स्टेट बँकेच्या हदगाव शाखेने काढलेल्या विम्याची संरक्षित रक्कम मुख्य व्यवस्थापक प्रकाश मेका, उपव्यवस्थापक राजकुमार फुलपाटील, वरिष्ठ व्यवस्थापक संजय चंद्रवंशी यांच्या हस्ते धनादेशाद्वारे वितरित करण्यात आली. यावेळी बँकेचे कर्मचारी गजानन करडखेले, शुभम हनवते, ज्ञानेश्वर सुरोसे इत्यादी उपस्थित होते.या योजनेचा ला घेण्यासाठी १८ ते ५० वर्षे वयोगटातील कोणालाही ४३६ रुपये भरून विमा काढता येतो. यामध्ये लाभ घेण्यासाठी बँक खाते आवश्यक आहे. नैसर्गिक अथवा अपघाती, कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास वारसांना दोन लाख रुपये दिले जातात. विमाधारकांना ५० वर्षांपूर्वी या योजनेत सामील होणे आवश्यक आहे.




# रादूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध बिल रिबेटचे अनामत वाटप

**राहुरी । प्रतिनिधी**

लोणी, ता. राहाता येथील हसनापूर रोडवरील हॉटेल साई छत्र येथे साईबाबा दूध संकलन केंद्राच्या वतीने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध बिल रिबेटचे अनामत वाटप समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभाला माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील आणि खासदार डॉ. सुजय विखे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील यांनी या संकलन केंद्रामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव आणि न्याय मिळत असल्याचे उल्लेखित केले. त्यांनी केंद्राचे संचालक गोरख विखे यांचे विशेष कौतुक केले आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. तसेच, अशा प्रकारच्या केंद्रांनी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यास



महत्त्वपूर्ण योगदान देण्याचा विश्वास व्यक्त केला. समारंभात दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नंदूशेठ राठी आणि अशोक धावणे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# अस्मानी संकटाचा बळी बळीराजा शासना कडे त्वरित आर्थिक मदतीची मागणी

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी पुलगाव विधानसभा मतदारसंघात शनिवारी संध्याकाळी झालेल्या परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. या पावसामुळे सोयाबीन, पांढऱ्या सोनाने ओळखले जाणारे कापूस पिक आणि फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

आगामी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या संकटाबाबत विचार करता, आमदार रणजीत दादा यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्वरित पंचनामा करण्याची मागणी केली आहे. आमदारांनी सरकारकडे शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत उपलब्ध करण्याची अपील केली आहे. शेतकऱ्यांचे संकट लक्षात घेता लवकरात लवकर उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या अस्मानी संकटात त्यांना आधाराची गरज आहे. शासनाने त्वरित आर्थिक मदतीसाठी योग्य पावले उचलावीत, असे आमदार रणजीत दादा यांनी म्हटले.

या संकटामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढत असून, त्यांच्या भविष्यातील उत्पादनावर याचा गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. शासनाच्या उपक्रमांची प्रतीक्षा असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लवकरात लवकर निर्णय घेतला जावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



# मातोश्री आशाताई कुणावर महिला महाविद्यालयात एक दिवसीय गणित संगणक कार्यशाळा आयोजित

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत एक दिवसीय गणित संगणक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्षपद डॉ. उमेश तुळसकर, प्राचार्य, मातोश्री आशाताई कुणावर महाविद्यालय, यांनी भूषवले.

कार्यशाळेत अतिथी प्रमुख म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. शिल्पा समदूरकर, गणित विभाग प्रमुख, विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर, यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, उच्च व तंत्र शिक्षण पदवीच्या पहिल्या वर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रेडिट गुणांकन पद्धतीनुसार अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. डॉ. समदूरकर म्हणाल्या या पद्धतीनुसार, प्रत्येक विषयाचे क्रेडिट निश्चित केले जाईल. यामध्ये एकसमानता आणली जाईल, म्हणजेच राज्यातील सर्व विद्यापीठांच्या महाविद्यालयांमध्ये विषयांचे क्रेडिट एकसमान असणार आहे. यासाठी विद्यापीठ स्तरावर काम सुरू आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राकेश लोणकर यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी कार्यशाळेची रूपरेषा सादर केली. आभार प्रदर्शन प्रा. किरण कष्टी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सहकार्य केले. या कार्यशाळेने विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल अधिक माहिती मिळवून त्यांच्या अध्ययन प्रक्रियेत नवे दृष्टीकोन आणण्यास मदत केली.



# माळी समाजाची कोजागिरी उत्साहात साजरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणगाव येथे माळी समाज युवक आघाडीतर्फे १९ ऑक्टोबर रोजी सिद्धेश्वर मंदिर हॉलमध्ये कोजागिरी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रात्री जोरदार पाऊस येऊनही कोजागिरीसाठी २०० युवक आणि समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी झालेल्या सभेचे प्रास्ताविक माळी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष अरविंद नागतोडे यांनी केले. चर्चेच्या वेळी उपस्थितांनी आपली मते व्यक्त केली. २८ नोव्हेंबरला महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी महात्मा फुले चौक येथे साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, १० मार्च रोजी येणारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी मातामाय मंदिर चौक येथे साजरी करावी, अशी सूचना नितीन रामगावकर यांनी केली, जी सर्वांनी मान्य केली. महेश चांदोरे व उपस्थित युवकांनी महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी ११ एप्रिल रोजी फुले यांची रॅली काढण्यात यावी, अशी सूचना केली. त्याला सुद्धा सर्वांनी होकार दिला. समाजाच्या प्रत्येक घरी फुले दांपत्याचे फोटो असावे आणि ना नफा ना तोटा या तत्वावर असे फोटो म. फुले जयंतीदिनी उपलब्ध करावे, अशी सूचना सिद्धेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील नागतोडे यांनी मांडली, जी उपस्थितांनी मान्यता दिली. यानंतर सर्वांनी नाश्ता व कोजागिरीच्या दुधाचा आस्वाद घेतला. आभारप्रदर्शन मकरंद चांदोरे यांनी केले.

# हदगांव मतदारसंघात ३३७ मतदान केंद्र आणि २,९६,५६८ मतदार;आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे

**नांदेड | बालाजी पाटील**

हदगाव व हिमायतनगर या दोन तालुक्यातून बनलेल्या ८४ हदगांव मतदारसंघात २,९६,५६८ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदारसंघात ३३७ मतदान केंद्रे असून २०६ महसुली गावे, १७० ग्रामपंचायती, अकरा महसूल मंडळे, एक नगरपरिषद व एक नगरपंचायत आहेत.

हदगाव विधानसभा मतदारसंघात हदगाव तालुक्यात ११८ ग्रामपंचायती अंतर्गत १३८ महसुली गावे आहेत. याचप्रमाणे हिमायतनगर तालुक्यात ५२ ग्रामपंचायती अंतर्गत ६८ महसुली गावे आहेत, ज्यामध्ये तीन जिल्हा परिषद सर्कल व हिमायतनगर येथे नगरपंचायत आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांनी तहसील कार्यालयात पत्रकार परिषद घेत या निवडणुकीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, हदगांव मतदारसंघात एकूण २,९६,५६८ मतदार आहेत. त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या १,५३,७२५ असून महिला मतदारांची संख्या १,४२,८३९ आहे.

निवडणूक प्रक्रियेला २२ ऑक्टोबर रोजी सुरुवात होणार असून २९ ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील. ३० ऑक्टोबर रोजी या पत्रांची छाननी केली जाईल. ४ नोव्हेंबरपर्यंत नामनिर्देशन पत्र परत घेता येतील, आणि त्याच दिवशी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाईल. २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान घेण्यात येणार आहे, आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीची घोषणा १५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. त्या अनुषंगाने हदगांव विधानसभा मतदारसंघात आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. तहसील कार्यालयामध्ये २४ विशेष कक्ष स्थापन करण्यात आले आहेत, आणि त्यावर २४ नोडल अधिकारी नियुक्त केले गेले आहेत. चार पोलीस स्टेशनच्या ठिकाणी चेक पोस्ट तयार करण्यात आले आहेत. आचारसंहितेचा भंग केल्यास कुणाची गय केली जाणार नाही, असे स्पष्ट केले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा हिमायतनगरच्या तहसीलदार पल्लवी टेमकर आणि सर्व कार्यालय प्रमुख उपस्थित होते.



# चांदसुर्ला येथील युवा कार्यकर्त्यांच्या प्रवेशाने काँग्रेस पक्षाला खिंडार

**मूल | प्रतिनिधी**

ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून चंद्रपूर तालुक्यातील बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतला.

या प्रवेश सोहळ्यात भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंदेलसिंह चंदेल, प्रमोद कडू, अनिल डोंगरे, व प्रदेश उपाध्यक्ष अर्जुन नागरकर यांची उपस्थिती होती. युवा कार्यकर्त्यांच्या प्रवेशाचे मुख्य कारण म्हणजे लोकसभा निवडणुकीला पाच सहा महिने लोटून गेल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या विजयी उमेदवारांनी ज्या युवा कार्यकर्त्यांना आश्वासने देऊन स्वप्ने दाखविली होती, त्याची कुठेही पूर्तता होताना दिसत नसल्यामुळे नाराज



काँग्रेस युवा कार्यकर्त्यांनी हा निर्णय घेतला. प्रवेश घेणाऱ्या युवा कार्यकर्त्यांमध्ये जयेंद्र ताजने, बबलू आत्राम, सतीश हेलवडे, विजय गौरकार, नितीन ढोके, अतुल हेलवडे, चंद्रकांत दातारकर, लक्ष्मण नागरकर आणि रवी हेलवडे यांची उपस्थिती होती.काँग्रेस पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांना अपेक्षित असलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्यामुळे त्यांची नाराजी वाढली असून, त्यामुळे त्यांनी भाजपात प्रवेश करून विकासाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे. या घटनाक्रमामुळे काँग्रेस पक्षाला एक मोठा धक्का बसला असून, आगामी निवडणुकांसाठी भाजपाच्या कार्यपद्धतीवर चर्चा सुरु आहे.

### समाज बांधवांकडून ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार

# मोहुर्ले यांच्या पाठपुराव्याला मिळाले घवघवीत यश

**मूल | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी सोबत जुडल्यापासून, प्रवीण मोहुर्ले यांनी मूल नगरपरिषदचे उपाध्यक्ष म्हणून आणि पक्षाचे कर्तबगार हरहुन्नरी कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहून आपल्या जीवनातील बहुमूल्य वेळ जनतेच्या आणि समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी समर्पित केला आहे.



माळी समाजाचे युवा तडफदार नेतृत्व असलेल्या प्रवीणभाऊंचे कार्य प्रचंड प्रेरणादायी आहे.

आज त्यांच्या कार्यशैलीच्या जोरावर, मूल येथील वॉर्ड क्रमांक २ आणि ३ मधील माळी समाज बांधवांच्या मागणीची दखल घेत, ना .सुधीर मुनगंटीवार (वने व मत्स्य व्यवसाय मंत्री, म.रा. तथा पालकमंत्री, चंद्रपूर जिल्हा) यांच्या विकास आराखड्यातून ५८.८८ लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

प्रवीण मोहुर्ले यांच्या सामाजिक कार्याची पद्धत आणि त्यांच्या कार्यक्षमतेमुळे माळी समाजाला योग्य न्याय मिळवून देण्यात मदत मिळाली आहे. त्यांच्या विचारसरणीमुळे समाजाला सोबत घेऊन चालण्याचे ध्येय साधता आले आहे. मूल तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा माळी समाजाच्या न्याय मागण्या पूर्ण करण्यासाठी ते सतत कार्यरत आहेत. त्यांच्या कर्तुत्वावर आधारित कार्यशैली सामाजिक कार्यामध्ये उत्कृष्ट ठरते. त्यांच्या कामकाजात चित्तरंजन वाढई, मनीष कावळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी कार्यरत असलेल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचे योगदान अनमोल आहे. अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आवश्यक आहे, कारण दिवसा कंदील धरून फिरले तरी मिळत नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा नेतृत्वाच्या पाठीशी ठाम उभे राहून समाजाला आगळी वेगळी दिशा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध राहावे ही विनंती.

# धान उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा मिळणार कधी-निकेसर

### पात्र शेतकरी प्रतीक्षेत; नुकसान भरपाईचा अद्याप पत्ता नाही

**मुल | प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांसाठी पीक विमा हा महत्त्वाचा आधार ठरतो. मात्र, विमा उतरवल्यानंतरही वेळेत भरपाई मिळत नसल्याचा अनुभव धान उत्पादक शेतकऱ्यांना येतो आहे. मुल तालुक्यातील पात्र शेतकरी २०२३ च्या पीक विम्याच्या प्रतीक्षेत असून, अद्याप त्यांना रक्कम प्राप्त झालेली नाही. मुल तालुक्यात मोठ्या प्रमाणावर धान पिकाची शेती केली जाते. कापूस आणि सोयाबीनसारख्या पिकांचेही लागवड क्षेत्र आहे. मात्र, बदलत्या हवामानामुळे आणि अवकाळी पावसामुळे धान उत्पादकांना मोठा फटका बसला आहे. परिणामी, उत्पादन घटल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नुकसानभरपाईसाठी शासनाच्या पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत भारतीय कृषी विमा कंपनीकडून विमा उतरवण्यात आला होता. मात्र, नुकसानीची माहिती दिल्यानंतरही शेतकऱ्यांना विमा रक्कम अद्याप मिळालेली नाही. आनंदाचा दिवाळी सण तोंडावर असताना शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. विमा कंपनीकडे पैसे उपलब्ध असतानाही अद्याप भरपाई दिली गेलेली नाही. पीक विम्याची रक्कम लवकरात लवकर मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. गेल्या वर्षी अवकाळी पावसामुळे धान पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वेळेवर विमा कंपनीला कळवले असून, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज भरून पात्र यादीत माझे नाव आले. तरीही अजून विमा रक्कम मिळालेली नाही, असे अनिल निकेसर, फिस्कुटी येथील शेतकरी, यांनी सांगितले. शासनाने आणि विमा कंपनीने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# साक्री विधानसभेसाठी आता माघार नाही इंजि.के.टी.सूर्यवंशी यांनी फुंकले रणशिंग

**साक्री | प्रतिनिधी**

साक्री विधानसभा मतदारसंघात इच्छुक उमेदवार इंजिनिअर श्री के.टी. सूर्यवंशी यांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. त्यांच्या गाव भेटींमध्ये कार्यकर्त्यांकडून मिळालेला जोरदार प्रतिसाद हे त्यांच्या लोकप्रियतेचे खरे प्रमाण आहे.

इंजि. के.टी. सूर्यवंशी यांच्या मागे कार्यकर्त्यांचा गोतावळा पाहून विरोधकांच्या गोटात खळबळ उडायला लागली आहे.

साक्री तालुक्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी, सगे-सोयरे यांच्याशी चर्चा करून आणि भेटीगाठी घेत मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळत आहे.

साक्री विधानसभा मतदारसंघात इंजि. के.टी. सूर्यवंशी हे शेतकरी, कष्टकरी आणि दिनदुबळ्यांचे हित जाणणारे प्रभावी नेतृत्व



मानले जात आहेत. येणाऱ्या निवडणुकीत विद्यमान आमदारांना शह देण्यासाठी त्यांनी जोरदार मोर्चे बांधणी केली आहे.

साक्री व पिंपळनेर मंडळातील मतदारांना प्रत्यक्ष भेटून इंजिनीयर के.टी. सूर्यवंशी यांना उदंड प्रतिसाद मिळत आहे. साक्री तालुक्याच्या जनतेची जुळलेली नाळ मजबूत असल्याने ती जमेची बाजू आहे.

साक्री तालुक्यातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा नेता आता हवा चेहरा नवा आहे. आता माघार नाही; पूर्ण ताकतीने लढणार आणि जिंकणार, अशीच भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

साक्री तालुक्यातील जनतेचा हा उस्फूर्त प्रतिसाद निश्चितच आगामी निवडणुकीसाठी सकारात्मक संकेत देत आहे.साक्री विधानसभेसाठी आता माघार नाही; इंजि. के.टी. सूर्यवंशी यांनी फुंकले रणशिंग

# हजारवाडीत पाटील गटाला तर गुळसडीत बागल गटाला शिंदे गटाचा दे धक्का

**सोलापूर | प्रतिनिधी**

२०२४ विधानसभेची आचारसंहिता सुरू झाल्यानंतर आमदार संजयमामा शिंदे गटामध्ये जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. आज दिनांक २० ऑक्टोबर रोजी निमगाव येथे हजारवाडी येथील आजी-माजी ग्रामपंचायत सदस्यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार संजय शिंदे गटात प्रवेश केला. याचबरोबर, गुळसडी येथील बागल परिवाराने बागलांना दे धक्का देत, संजयमामा शिंदे यांच्या कामाने प्रभावित होऊन शिंदे गटात प्रवेश केला.

हजारवाडी (पोफळज) तालुका करमाळा येथील माजी सरपंच दादासाहेब हाके, माजी उपसरपंच भाऊसाहेब उत्तम हजारे, ग्रामपंचायत सदस्य आप्पा हजारे, माजी ग्रामपंचायत सदस्य श्रीरंग हजारे, रवींद्र रमेश हजारे, प्रेमचंद हजारे, भाऊ ईश्वर हजारे, विलास वाघमारे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार संजय मामा शिंदे गटात प्रवेश केला.गुळसडी गावचे युवा नेते सतिष बागल, समाजिक कार्यकर्ते अनुरथ बागल, डॉ. विजय बागल, नंदकुमार बागल, सुनील बागल, पै. संदीप बागल, सुधीर बागल, अजय बागल, नितीन अडसूळ, प्रथमेश गायकवाड, कृष्णा सुरवसे, शत्रगुन जाधव यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व सर्व बागल परिवार मित्रपरिवार यांच्यासह सर्वांनी आमदार संजयमामा शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते



### आमदार संजयमामांच्या कामाने प्रभावित

**आमदार संजय शिंदे यांनी दहिगाव उपसा सिंचन योजना सक्षमपणे चालवून करमाळा तालुक्यातील पूर्व भागाचे नंदनवन केले. त्याचबरोबर, मामासाहेबांनी केलेली विकास कामे आणि काम करण्याची पद्धत याबाबत श्री. सतीश बागल यांनी सांगितले की, या सर्व गोष्टींचा विचार करून आपण सर्व परिवार व मित्रपरिवार यांच्यासह प्रवेश करत आहोत. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत गुळसडी गावातून भरघोस मतदान करून पुन्हा एकदा मामासाहेब यांना आमदार करण्याची ग्वाही दिली**

प्रवेश केलेल्या सर्व नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य लव्हेचे सरपंच विलास दादा पाटील, ज्येष्ठ नेते वामनराव बदे, मकाईचे माजी संचालक रामचंद्र पवार, पोपळज सोसायटीचे चेअरमन राजाभाऊ पवार, कंदरचे पैलवान उमेश इंगळे, करमाळा तालुक्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष सोमनाथ रोकडे, भोसरेचे पत्रकार हर्षल बागल, झरे गावचे सरपंच प्रशांत पाटील, वागीं-२चे युवा नेते समाधान देशमुख, अशोक तकीक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय मोरे उपस्थित होते.

# पत्र्याच्या शेड मधील कापसाला मध्य रात्रीनंतर आग लागून लाखाचे नुकसान

**धारूर | प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील चौंडी येथे मध्यरात्रीनंतर आग लागल्याने एक शेतकरी एक लाख रुपयांचे नुकसान भोगला आहे. कापसाची वेचणी करून घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये साठवलेल्या २५ क्विंटल कापसाला शनिवारी (दि. १९) मध्यरात्री दोनच्या सुमारास आग लागली.



चौंडी येथील भीमा यंका मुंडे कुटुंबासह शेतात वास्तव्य करतात. सध्या कापूस वेचणी चालू असल्याने त्यांनी कापसाची गंजी घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये बंद खोलीत ठेवली होती. शनिवारी रात्री पाऊस आल्याने मुंडे कुटुंबीय घरात जाण्यासाठी उठले असता, पत्र्याच्या शेड मधून धूर निघत असल्याचे त्यांना जाणवले. सावधानता राखत त्यांनी तातडीने आग लागलेल्या कापसाच्या गंजी मधील अर्धा कापूस वेगळा केला, त्यामुळे १५ क्विंटल कापूस राख होण्यापासून वाचला.

तथापि, जवळपास १२ ते १३ क्विंटल कापसाचे जळून राख झाले, ज्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. या शेतकऱ्यास तातडीने शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी केली जात आहे. घटनास्थळी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी रविवारी येऊन पाहणी करत पंचनामा केला.

विशेष म्हणजे, पत्र्याच्या शेडमध्ये लाईटचे कनेक्शन नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक सुरक्षा आणि संरक्षण आवश्यक आहे.



**शेतकऱ्यांनी शेतात धान पिकाची कापणी केलेल्या कडपावर आपले भक्ष्य टिपताना एक बगळा.छाया: प्रणय बांगरे**

# विवाहित ईशा बहकली, तुषार सोबत घसरली

# गर्भवती झाल्यावर लग्नास नकार ऐकून बिथरली




जळगाव (प्रशांत कुंडकर)–फेसबुकवर झालेल्या ओळखीतून विवाहित ईशा (काल्पनिक नाव )आणि तुषार अहिरे यांच्यात जवळीक वाढली. विवाहबाह्य नात्यातून ईशा गर्भवती झाल्यावर तिने लग्नाचा प्रस्ताव दिला, मात्र तुषारने नकार देत गर्भपाताचा दबाव टाकला. फसवणुकीची जाणीव झाल्यानंतर ईशाने शनिपेठ पोलीस ठाण्यात तुषारविरोधात बलात्काराची तक्रार दाखल केली, ज्यावर तपास सुरू आहे. दैनिक सह्याद्रीचा राखणदार च्या वाचकांसाठी या घटनेचा खास सविस्तर वृत्तांत. ईशा (काल्पनिक नाव) वयात येताच तिच्या पालकांनी तिच्यासाठी योग्य स्थळ शोधण्यास सुरुवात केली. ईशा जेमतेम अठरा वर्षांची होती. बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तारुण्यात पदार्पण करताच तिचे लग्न झाले. लग्नानंतर ती जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात पतीसोबत सासरी राहू लागली. रावेर तालुक्यात हवा तसा रोजगार नसल्यामुळे तिच्या पतीने जळगावला येण्याचे निश्चित केले. ती तिच्या पतीसह जळगाव येथे राहण्यास आली. तिच्या पतीला जळगाव शहरात एका दुकानावर काम मिळाले. सकाळी नऊ वाजता तिचा पती जेवणाचा डबा सोबत घेऊन जात असे. सकाळी दहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत तिचा पती दुकानावर नोकरी करत होता. घरी येईपर्यंत त्याला रात्रीचे दहा वाजत होते. अशा प्रकारे पूर्ण दिवस त्याचा दुकानावर जात होता. या कालावधीत ईशा घरी एकटीच राहत होती.





पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे



तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातीर

घरी एकटी असलेली ईशा मोबाईलवर व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम असे विविध ॲप्स हाताळत होती. ती मोबाईल हाताळण्यात जणू काही पारंगत झाली होती. रात्रीच्या वेळी आणि रविवारी सुटीच्या दिवशी तिला तिच्या पतीचा पूर्ण सहवास लाभत होता. लग्नानंतर तिला पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्यानंतर पाच वर्षांनी तिला दुसऱ्या वेळेसही पुत्ररत्नाचा लाभ झाला. अशा प्रकारे तिच्या संसार वेलीवर दोन पुत्र विराजमान झाले. हम दो हमारे दो असा तिचा चौकोनी संसार सुरळीत सुरू होता. मात्र, का कुणास ठाऊक, तिच्या संसाराला कोणते तरी ग्रहण लागले. तिचा पती तिच्यासोबत नेहमी वाद घालत होता, तीदेखील त्याच्यासोबत वाद घालत होती. अशा प्रकारे पती–पत्नीचा वाद सुरूच होता. २०१८ मध्ये ईशाच्या लग्नाला तीन वर्षे झाली होती. तिला मोबाईल हाताळण्याचा नाद लागला होता. फावल्या वेळात ती मोबाईलवर व्यस्त राहात होती. त्यातल्या त्यात तिला फेसबुक हाताळण्याची सवय लागली. तिला नवीन फेसबुक फ्रेंड मिळाले. या कालावधीत फेसबुकवर तिची तुषार राजेंद्र अहिरे या तरुणासोबत मैत्री झाली. तुषार तिच्यापेक्षा तीन वर्षे वयाने मोठा होता. दोघे एकमेकांसोबत फेसबुकवर चॅटिंग करू लागले. सुरुवातीला 'हाय–हॅलो'ने सुरुवात झालेली त्यांची मैत्री आणि चॅटिंग नंतर थेट संभाषणात परावर्तीत झाली. त्याला ती आवडत होती. त्यामुळे त्याने त्याच्या एका मित्राकडून तिचा मोबाईल नंबर शिताफीने मिळवला. अंधारात दगड मारल्यागत त्या क्रमांकावर त्याने कॉल केला असता पलीकडून त्याच्या कर्णपटलावर मंजुळ स्वर आला. त्या मंजुळ स्वर असलेल्या तरुण विवाहितेला त्याने नाव विचारले. तिने तिचे नाव ईशा सांगितले. त्यामुळे आपला कॉल हा रॉंग नंबर नसून करेक्ट नंबर असल्याची त्याला



खात्री झाली. त्याने आपला परिचय तिला दिला. आपण दोघे फेसबुक फ्रेंड असल्याचे त्याने तिला कथन केले. अशा प्रकारे दोघांची व्हॉईस कॉल मैत्रीदेखील झाली. दोघे एकमेकांसोबत बराच वेळ मोबाईलवर गप्पा करू लागले. त्यानंतर दोघे प्रत्यक्ष भेटू लागले. दरम्यानच्या कालावधीत ईशाचा पती दुकानावर राब–राब राबत असे, आणि ती इकडे तुषारसोबत चॅटिंग, कॉलिंगसह भेट घेण्यात व्यस्त राहात होती. अशा प्रकारे दिवस मागून दिवस जात होते. ईशाच्या घरची परिस्थिती आणि वातावरण आता तुषारला परिचित झाले होते. तिचे तिच्या पतीसोबत जमत नसल्याचे त्याला समजले होते. त्यामुळे ईशा नेहमी उदास राहात असल्याचे त्याला जाणवले. तिची उदासी दूर करण्यासाठी त्याने तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यात तो यशस्वी झाला. तुषारच्या गोड बोलण्याला ती भुलत गेली. त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या अंगाला स्पर्श करू लागला. त्याला ती जवळ करू लागली. या जवळीकतेचे रूपांतर शरीरसंबंधात झाले. ४ जुलै २०२४ रोजी तुषारचा वाढदिवस असल्याच्या निमित्ताने तो तिला हॉटेलमध्ये घेऊन गेला आणि तिथेही शरीरसंबंध प्रस्थापित झाले. दरम्यान, ईशा गर्भवती राहिली. तिने तुषारला याबाबत माहिती दिली, मात्र तुषारने लग्न करण्यास नकार देत गर्भपातासाठी गोळ्या देऊ केल्या. ईशाने लग्नाचा तगादा लावल्यावरही त्याने नकार दिला. त्यामुळे ती शनिपेठ पोलीस स्टेशनला जाऊन तुषारविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला. पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या पथकाने तुषारला अटक केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातीर करत आहेत.

## संतापजनक..चिमुकलीवर 3 नराधमांकडून अत्याचार

### बीडच्या चौसाळा येथील धक्कादायक घटना;घटनेनंतर आरोपी फरार

**बीड । प्रतिनिधी**



राज्यात सातत्याने होत असलेल्या मुलींवरील अत्याचाराच्या घटनेत पुन्हा एका घटनेची भर पडली आहे. एका १० वर्षीय चिमुकलीवर तीन जणांनी मिळून लैंगिक अत्याचार करण्यात आला. शंभर रुपये व चिकन खायला देण्याचे आमिष देत अत्याचार केल्याची धक्कादायक घटना बीडच्या चौसाळा गावात घडली आहे.

बीडच्या चौसाळा येथील १० वर्षीय पीडित चिमुकलीला राजेंद्र रामलिंग चंदनशिवे, सागर राजेंद्र चंदनशिवे (दोघेही रा. वंजारवाडी ह. मू. चौसाळा) तसेच आशिफ कुमार चौधरी उर्फ कल्लू (नेपाळी) ह.मू. वाशी, जि. धाराशिव या तिघांनी मिळून चिमुकलीला १०० रुपये व चिकन खायला देण्याचे आमीष दाखवले. त्यानंतर पीडित चिमुकलीच्या जुन्या घरात जाऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. जर अश्लील कृत्याची ही बाब कोणाला सांगितल्यास तुझ्या आई वडिलांना जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. या धमकीने पीडित बालिका खुप घाबरली असून त्यानंतर याप्रकरणी पीडित बालिकेने घडला प्रकार घरात सांगितला. यानंतर तिच्या आईने पोलिसात धाव घेत घडला प्रकार सांगत तक्रार दाखल केली. दिलेल्या फिर्यादीवरून बीडच्या नेकनुर पोलीस ठाण्यात बालक लैंगिक अपराध संरक्षण कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांकडून अत्याचार करणाऱ्याचा शोध सुरु आहे

## समाजातील छोट्या समुहाला प्रतीनिधित्व देणारे बाळासाहेब आंबेडकर

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**



लोकशाहीत प्रत्येक समुहाला प्रतीनिधित्वाची संधी मिळणे आवश्यक असले तरीही, आजच्या काळात ती मिळवणे कठीण झाले आहे. परंतु बाळासाहेब आंबेडकर हे एकमात्र नेते आहेत, जे वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून समाजातील सर्वात छोट्या समुहाला प्रतीनिधित्वाची संधी देत आहेत. असे ठाम मत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा निरिक्षक गोविंद दळवी यांनी पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या सांगता समारंभात व्यक्त केले.

पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन सुरू होते. या ग्रंथाचा सांगता समारंभ १७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमादरम्यान गावातील प्रमुख रस्त्यांनी धम्म रॅली काढण्यात आली. नंतर गावातील माता रमाई सभागृह हदगाव बु. येथे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली.गोविंद दळवी पुढे म्हणाले, तथागत भगवान बुध्द व त्यांचा धम्म जगाला शांती आणि सद्भावनेची शिकवण देत आहेत. आपण बुध्दाच्या शिकवणीचे अनुसरण केले पाहिजे, ज्यामुळे आपली सामाजिक, वैचारीक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती होईल. त्याचप्रमाणे राजकीय प्रगती सुद्धा आवश्यक आहे.या प्रसंगी भंते पी धम्मानंदजी, कार्यक्रमाचे अध्यक्ष व भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुका अध्यक्ष टि.एम. शेळके, जेष्ठ नेते प्रकाश उजागरे, टि.डी. रुमाले, भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका अनिताखंदारे, केंद्रीय शिक्षक के.वाय. दवंडे, बौद्धाचार्य दादाराव ब्रम्हराक्षे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन करणारे प्रकाश नरवडे यांचा त्यांच्या पत्नीसमवेत सत्कार करण्यात आला. तसेच गावातील बालकांना मोफत शिकवणी देणारे सचिन साळवे व दिव्या कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिलीप मोरे यांनी केले, तर सूत्रसंचलन बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे यांनी केले. आभार ग्रंथ वाचक प्रकाश नरवडे यांनी मानले. सदरील कार्यक्रम संपन्न करण्यासाठी सत्यभामाबाई नरवडे, लताबाई भदर्गे, चंद्रकलाबाई गनकवार, सुनिता साळवे, रुकमीनबाई ढवळे, सत्यभामाबाई मुधावने, आशामती वाव्हळे, मिलिंद खरात, आशोक नरवडे, प्रकाश नरवडे, लक्ष्मण कदम, बळीराम कदम, बि.टी. कदम, दलीत नरवडे सह समस्त गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावला

**कन्नड । प्रतिनिधी**



कन्नड तालुक्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांची दैना उडाली आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. घाटशेंद्रा, टाकळी, चिंचोली, नेवपुर, लोहगाव आदी परिसरात सातत्याने पाऊस होत आहे, ज्यामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

रात्री विजांच्या डकडाटात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे शेतामध्ये सोंगणी करून ठेवलेला मक्याचा चारा, कणसे व सोयाबीन पाण्यात भिजून नष्ट झाला आहे. भिजलेल्या मक्याच्या कणसांना आणि सोयाबीनला आता कोंब फुटत आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात वेचणीला आलेला कापूस या पावसामुळे भिजला असून कापसाच्या वाती खराब झाल्या आहेत.

कपाशीच्या झाडांवरून फुटलेला कापूस पावसाने ओला होऊन जमिनीवर पडून खराब झाला आहे. पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे प्रशासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. गेल्या तीन दिवसांपासून काही भागात मुसळधार पाऊस सुरू आहे, ज्यामुळे शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

या आस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे, आणि बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

## वर्धा विधानसभा २०२४

## भाजपाची यादी जाहीर

**वधा । प्रतिनिधी**



भाजपाने चार विधानसभा क्षेत्रांपैकी तीन ठिकाणी आपल्या उमेदवारांची घोषणा केली आहे, परंतु आर्वी मतदारसंघात अद्याप उमेदवाराचे नाव जाहीर झालेले नाही. विद्यमान आमदार डॉ. पंकज भोयर (वर्धा) आणि समीर कुणावार (हिंगणघाट) यांना तिसऱ्यांदा संधी देण्यात आली आहे.

डॉ. पंकज भोयर यांनी २०१४ आणि २०१९ मध्ये काँग्रेसचे उमेदवार शेखर शेंडे यांचा पराभव केला. २०१९ मध्ये त्यांनी ७९,७३९ मतांनी विजय मिळवला. वर्धा विधानसभेत केलेला विकास हा त्यांच्या विजयाचा मुख्य आधार आहे.

समीर कुणावार यांनाही २०१४ आणि २०१९ मध्ये विजय मिळवला. २०१९ मध्ये त्यांनी १,०३,५८५ मतं मिळवली आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राजू तिमांडे यांचा पराभव केला. त्यांच्या कार्याचा आदर ठेवल्यामुळे त्यांना तिसऱ्यांदा उमेदवारी मिळाल्याचे दिसते.

देवळी मतदारसंघात राजेश बकाने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. २०१९ मध्ये ते अपक्ष म्हणून रिंगणात होते आणि ३९,५४१ मतं मिळवली होती. कांबळे यांच्यावर असलेली नाराजी आणि बकाने यांचा जनसंपर्क यामुळे त्यांना यंदा फायदा होण्याची शक्यता आहे.

आर्वी विधानसभा संदर्भात भाजपात अंतर्गत संघर्ष सुरू आहे. आमदार दादाराव केचे आणि सुमित वानखेडे यांच्यात उमेदवारीसाठी स्पर्धा आहे. महाविकास आघाडीकडून नवीन चेहरा देण्याची चर्चा सुरू आहे, ज्यामुळे सुमित वानखेडे यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील लक्ष आर्वी मतदारसंघाकडे लागले असून, आगामी निवडणुकांमध्ये भाजपाच्या उमेदवारीची अंतिम यादी लवकरच जाहीर होईल, असे समजते

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या:खा.उदयनराजे भोसले यांचे आवाहन

**सातारा (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच दशकांमध्ये शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते होते. मात्र त्यांनी मराठा आरक्षणासह पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचन योजना लटकत ठेवल्या. त्यांनी स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी इतरांना वंचित ठेवण्याचे काम केले. गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रात विकासाची जी फळे आहेत ती महायुती सरकारमुळे दिसत आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मतदार राजाने जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील लेक व्हयू हॉटेलमध्ये आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी सातारा-जावळी या दोन तालुक्यातील बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी खासदार उदयनराजे भोसले बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्राचे प्रभारी अजय जामवाल, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, सुनील काटकर, अविनाश कदम, भरत पाटील, सौरभ शिंदे, रंजना रावत, निशांत पाटील, अशोक मोने, माजी सभापती वसंतराव मानकुमरे, ज्ञानदेव रांजणे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खा.उदयनराजे भोसले म्हणाले, काँग्रेसने गेल्या ५० वर्षांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या सत्ता विकेंद्रीकरणाला मूठमाती देऊन घराणेशाही सुरू ठेवली आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे निर्णय बरीच वर्ष प्रलंबित राहिले होते.



यशवंतरावांच्या यशवंत विचारांचा विसर काँग्रेसला पडला असून जातीय तेढ निर्माण करण्याचे पाप काँग्रेसने केले आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते असताना महाराष्ट्रातील सिंचनाचे रोजगाराचे शिवाय मराठा आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित राहिले. हे प्रश्न सोडवण्यासाठी पवार यांचा कोणी हात धरला होता का? त्यांच्यावर कोणाचे दडपण होतं का? असे बरेच प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. शिवरायांचा जनकल्याणाचा सर्व समावेशक विचार केंद्रात भाजपने आणि राज्यात महायुती सरकारने अमलात आणला आहे. विरोधकांनी महाराष्ट्राला भूलथापा देण्यात आलेले काही केले नाही. त्यामुळे त्यांनी आरोप करताना स्वतः पहिले आत्मपरीक्षण करावे, अशी घणाघाती टोलेबाजी उदयनराजे यांनी केली. महायुतीच्या जिल्ह्यातील उमेदवारांना आपण भरभरून आशीर्वाद द्यावेत. जेणेकरून महाराष्ट्राची गेल्या पाच वर्षापासून ची प्रगती यापुढेही अखंड सुरू राहील. याकरिता महायुतीचे उमेदवार कसे निवडून येतील याकडे लक्ष द्या, असे आवाहन उदयनराजे यांनी केले.आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले बोलताना म्हणाले, निवडणूका आल्या की विरोधक आमदारकीसाठी बाशिंग बांधून तयार असतात. मात्र गेल्या पाच वर्षात विकासाचा कोणताही ठोस कार्यक्रम त्यांनी राबवलेला नाही. सत्तेच्या प्रवाहात असतानाही काहींनी केवळ काही न करता आमदारकीसाठी आता दावा ठोकला आहे. मात्र गेल्या पाच वर्षात सातारा व जावली तालुक्यात महायुतीच्या माध्यमातून प्रचंड विकास कामे झाली आहेत.

## शिवनेरभूषण आणि शिक्षणमहर्षी तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्यांना प्रदान



**जुन्नर । प्रदिप कोकाटे**

जुन्नर येथील आयोजित कार्यक्रमात शिवनेरभूषण, शिक्षणमहर्षी स्व. तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते स्व. विष्णू पाटीलबा शिंदे (आप्पा) यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक आणि व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी आमचे भविष्य आमच्या हाती या विषयावर विचार व्यक्त केले. डॉ. कळमकर म्हणाले, आयुष्यात संकट आणि संधी दोन्ही येतात, परंतु संकटावर मात करून संधीचे सोनं करणे महत्त्वाचे आहे. आपल्यातील कार्याची आणि कर्तुत्वाची जाणीव संकटे किंवा संधी आल्यावर होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर आलेल्या संधींचा योग्य लाभ घेण्याचा सल्ला.

## मुरबाड विधानसभा मतदार संघा मध्ये महायुतीचे उमेदवार किसन कथोरे यांच्या नावावर शिक्कामुहूर्त

**बदलापूर । प्रसाद दिनकरराव**

भारतीय जनता पार्टीने रविवारी (दि-२०) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी पहिली ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली या यादीमध्ये अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आले असून काही जणांचे तिकीटही कापण्यात आले आहे अनेक सुरक्षित मतदारसंघात विद्यमान आमदारांना संधी देण्यात आली आहे मुरबाड विधानसभेमध्ये उमेदवारीसाठी लागलेली चुरस अखेर संपली या विधानसभा मतदारसंघात पुन्हा एकदा भाजपाने किसन कथोरे यांच्यावर विश्वास दाखवून उमेदवारी जाहीर केली आहे



भाजपा ने जाहीर केलेल्या यादीनुसार किसन कथोरे यांच्या पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे यामुळे कथोरे समर्थकमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे तसेच या मतदारसंघांमध्ये महायुतीकडून शिवसेना शिंदे गटनी सुद्धा दावा केला होता आता या विधानसभामध्ये महायुतीकडून किसन कथोरे यांची उमेदवारी अधिकृतपणे शिक्कामुहूर्त झाला असून शिंदे गटाचे इच्छुक उमेदवार सुभाष पवार नक्की कोणता निर्णय घेतील याकडे मतदारसंघातील सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोठी बातमी ;शासनाकडून लाडकी बहीण योजनेचा हफ्ता होणार बंद


**राजेंद्र शिंदे । भिगवण**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत २ कोटी ४० लाखांहून अधिक पात्र महिलांना पाच महिन्यांचे हप्ते प्राप्त झाले आहेत. परंतु, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढचे हप्ते महिलांना मिळणार नाहीत, कारण तात्पुरत्या स्वरुपात लाडकी बहीण योजनेला स्थगिती मिळाली आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या अनुसार, राज्यात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या काळात मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या आर्थिक योजना बंद कराव्यात, असे निर्देश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. महिला आणि बालकल्याण विभागाकडून या योजनेसाठी लागणारा निधी थांबवला आहे. परिणामी, निवडणुकांपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांना मिळणार नाहीत. दरम्यान, राज्य सरकारने या योजनेअंतर्गत ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांचे एकत्र पैसे दिले होते, त्यामुळे आता डिसेंबर महिन्याच्या हप्ताची प्रतिक्षा करावी लागणार आहे.आर्थिक लाभ देऊन मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या योजना त्वरीत थांबवल्या पाहिजेत, अशी सूचना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आली आहे. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सर्व विभागांकडे याबाबतची विचारणा केली. महिला आणि बालकल्याण विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ दिला जात असल्याचे समोर आले. त्यामुळे विभागाकडून या योजनेची माहिती मागवण्यात आली. विभागाने योजनेसाठीचे निधी वितरण चार दिवसांपूर्वीच थांबवल्याची माहिती आयोगाला देण्यात आली आहे. परिणामी, निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे ही योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

## विज ग्राहक संघर्ष समितीचा महावितरणला इशारा



**कर्जत । सुनील घारे**

कर्जत तालुक्याच्या विज ग्राहक संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने महावितरण कार्यालयात जाऊन कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांची भेट घेतली. यावेळी, आंदोलन मागे घेत असताना महावितरणकडून देण्यात आलेल्या लेखी आश्वासनाची उजळणी करण्यात आली.

आंदोलन स्थगित केल्यानंतर सुरु झालेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याने ती तत्काळ थांबविण्याची मागणी यावेळी शिष्टमंडळाने केली. तसेच, कामचुकार अधिकारी वर्गावर कारवाई करणे आणि विज ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्याची मागणी केली गेली.

विज ग्राहक संघर्ष समितीने अधिकारी वर्गाला चांगलेच फैलावर घेतले. बैठकीदरम्यान कार्यालयाने देऊ केलेले चहा-पाणी नाकारून, अगोदर तालुक्यातील विजेची कामे ठरलेल्या मुदतीत पूर्ण करण्याची आग्रही मागणी केली. याशिवाय, पुढील पाच दिवसांत महावीर पेठेत ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणीही समितीने केली.

## वैजनाथ आप्पा सराफ यांना औंढा नागनाथ येथे श्रद्धांजली

**औंढा नागनाथ । प्रतिनिधी**

मराठवाडा नगरी सहकारी बँक लिमिटेड, हिंगोलीच्या औंढा नागनाथ शाखेत संस्थापक अध्यक्ष कै. वैजनाथ आप्पा सराफ यांच्या २४व्या स्मृतीदिनानिमित्त श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वैजनाथ आप्पा सराफ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष



मुंजाजीराव गोबाडे, संचालक पांडुरंग पाटील, बाबूआप्पा चोंढेकर, डॉ. सत्यनारायण अग्रवाल, पीडीसी बँक व्यवस्थापक हनुमान जाधव हे प्रमुख उपस्थित होते.

शाखा अधिकारी अर्चना देशमुख, कर्मचारी किरण जोशी, भरत राखोडे, ज्ञानेश्वर सोळंके, अंकुश चव्हाण, प्रफुल्लता शंकरवार, गायत्री चौधरी, सुमित टाक यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

## वैजापूर तालुक्यात बेकायदेशीर वाळू वाहतूक रोखली

**वैजापूर । प्रतिनिधी**


वैजापूर तालुक्यात दिवसेंदिवस बेकायदेशीर वाळू वाहतूक सुरू असून, गोदावरी नदीपात्रातून कायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर वैजापूर पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांनी भाऊर गावात ही कारवाई केली आणि या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला. विशाल रमेश बोरुडे (पुरणगाव), दीपक मच्छिंद्र गोरे (लाखगंगा), आणि किरण संदीप पवार (पुरणगाव) यांच्याविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. बेकायदेशीर वाळू वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांची पुढील तपास कार्यवाही सुरू आहे. वाळू वाहतूक हे एक गंभीर सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्न असून, या कारवाईने स्थानिक नागरिकांना थोडा दिलासा मिळाला आहे.




## २०२५ राज्यस्तरीय भाऊसाहेब माने कृषी गौरव पुरस्कारा साठी प्रस्ताव आमंत्रित

**उमरखेड । प्रतिनिधी**

सहकारमहर्षी भाऊसाहेब माने यांच्या ३२ व्या स्मृतिदिनानिमित्त ९ जानेवारी २०२५ रोजी राज्यस्तरीय भाऊसाहेब माने कृषी गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी प्रगतशील शेतकरी, कृषी संशोधन व विस्तार करणारे शास्त्रज्ञ, अधिकारी, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा महिला, तसेच शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांचे प्रस्ताव १० डिसेंबर २०२४ पर्यंत पाठवावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब ओझलवार यांनी केले आहे.



प्रस्तावात तीन पासपोर्ट साईज फोटो (फोटोच्या मागे नाव नमूद करणे), आधार कार्ड, मोबाईल नंबर, संपूर्ण पत्ता आणि संबंधित विभागाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रस्ताव अध्यक्ष, भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठान, कृषी महाविद्यालय, उमरखेड, जिल्हा यवतमाळ या पत्त्यावर पाठवावेत. पुरस्कार विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ देऊन गौरवण्यात येईल.

## घृणास्पद! पतीने मित्रांसह पत्नीवर केले लैंगिक अत्याचार

### धमक्यांचा वापर करत केला अनैसर्गिक कृत्यांचा व्हिडिओ शूट

**पिंपरी-चिंचवड । प्रशांत कुंडकर**

पिंपरी-चिंचवडमध्ये एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका सॉफ्टवेअर इंजिनिअर पतीने पत्नीवर अनैसर्गिक अत्याचार करत मित्रांना देखील तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यास प्रवृत्त केले. अत्याचाराचे व्हिडिओ शूट करून त्याच्या आधारे पत्नीला धमकावल्याचा प्रकारही समोर आला आहे.



पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, पतीने सप्टेंबर २०२३ ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत पुनावळे येथे घडलेल्या घटनांमध्ये तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. पतीच्या मित्रांनीही वेगवेगळ्या दिवशी तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला आणि या सर्व प्रकाराचा पतीने व्हिडिओ शूट करून तिची बदनामी करण्याची धमकी दिली.

पीडित महिलेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, पतीने तिला मित्रांसोबत शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. तिने विरोध केला असता पतीने शिवीगाळ करत तिच्यावर मानसिक दबाव आणला आणि अश्लील छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी दिली. तक्रारीत नमूद आहे की पतीने तिच्यासोबत अनेकदा अनैसर्गिक कृत्य केले आणि तीव्र विरोधानंतरही अत्याचार थांबवला नाही. हा प्रकार पुनावळे येथे एका पार्टीच्या वेळी घडल्याचे सांगितले जात आहे. पती व मित्र हे सर्व एका बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणारे उच्चशिक्षित कर्मचारी आहेत. तक्रार दाखल होताच हा गुन्हा रावेत पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला असून, पोलिसांनी पतीसह चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पीडित महिला सध्या ठाणे येथील तिच्या घरी राहत असून या प्रकरणी तिने पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. पतीशी अनेक दिवसांपासून तिचे वाद सुरू होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे. या घटनेने समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, नागरिकांकडून कडक कारवाईची मागणी केली जात आहे. रावेत पोलिस ठाणे या प्रकरणाचा सखोल तपास करत असून दोषींविरोधात कठोर कारवाई होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## दौंड मतदारसंघात विद्यमान आमदार राहुल कुल यांच्यासमोर दुहेरी आव्हान?

**दौंड । प्रतिनिधी**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला वेग आला आहे. अनेक मतदारसंघांत चुरशीच्या लढती रंगणार असल्याचे संकेत आहेत. दौंड विधानसभा मतदारसंघात विद्यमान भाजप आमदार राहुल कुल आणि माजी आमदार रमेश थोरात यांच्यात पुन्हा एकदा थेट लढत होण्याची शक्यता आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार यांना उमेदवारी मिळाल्यास तिरंगी लढतीची रंगत वाढणार आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू आणि माजी आमदार रमेश थोरात यांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) तिकिटावर लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, काही स्थानिक कार्यकर्त्यांचा थोरात यांच्या उमेदवारीला विरोध असून पक्षप्रवेशावरून संभ्रम निर्माण झाला आहे. शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांच्या निर्णयाकडे तालुक्यातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. राहुल कुल हे तिसऱ्यांदा आमदार होण्यासाठी सज्ज झाले असून तालुक्यात विविध विकासकामांचे उद्घाटन सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लावल्याचा दावा कुल यांनी केला आहे. मात्र विरोधकांकडून विकासकामे पोकळ आणि निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

रमेश थोरात यांनी निवडणूक लढवण्याची तयारी जाहीर केली असली तरी कोणत्या पक्षाचे चिन्ह घेऊन मैदानात उतरायचे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यांच्या समर्थकांमध्येही नाराजीचे वातावरण आहे. जर राष्ट्रवादी काँग्रेसने आप्पासाहेब पवार यांची नाराजी दूर करून थोरात यांना उमेदवारी दिली, तर त्यांचा मार्ग मोकळा होईल.

दौंड तालुक्यात भाजप आणि राहुल कुल यांच्याविरोधात नाराजी असल्याचे चित्र आहे. लोकसभेनंतर शरद पवार गटाचा प्रभाव तालुक्यात वाढला आहे, त्यामुळे थोरात यांना उमेदवारी दिल्यास महायुतीसमोर आव्हान उभे राहू शकते. दौंड मतदारसंघातील निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता आहे. भाजप आमदार राहुल कुल हे पुन्हा मैदानात उतरण्यास सज्ज आहेत, तर रमेश थोरात कोणत्या पक्षाचे चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. महायुतीतील अंतर्गत वादामुळे विरोधकांना संधी मिळू शकते का, हे येत्या काळात स्पष्ट होईल.

# इंदापूर तालुक्यातील लढत होणार चुरशीची

## तिरंगी लढतीने चर्चांना उधाण

**भिगवण । राजेंद्र शिंदे**

भिगवण: निवडणुकांचे वेध लागले तसे इंदापूर मतदारसंघात अनेक घडामोडींना वेग येऊ लागला आहे. इंदापूर तालुक्यात चुरशीची लढत होणार आहे. एकेकाळी इंदापूर तालुका हर्षवर्धन पाटील यांचा गड मानला जात होता. पाटील यांची इंदापूर तालुक्यात एकहाती सत्ता होती, परंतु पुढील काळात अजित दादा पवार यांनी दत्तात्रय भरणे यांना पुणे जिल्हा अध्यक्षपदी संधी दिली आणि पाठबळ दिले. २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत दत्तात्रय भरणे यांचा विजय झाला, तर हर्षवर्धन पाटील यांना पराभव पत्करावा लागला.

बारामती तालुका शेजारी असल्याने राजकीय दृष्ट्या इंदापूर तालुका नेहमीच चर्चेत राहिला आहे. हर्षवर्धन पाटील यांनी २०१४ मध्ये काँग्रेसकडून आणि २०१९ मध्ये भाजपकडून उमेदवारी मिळवली होती. परंतु या दोन्ही वेळा पाटील यांचा पराभव झाला. २०२४ विधानसभेपूर्वी भाजप पक्षाला सोडचिठ्ठी देत हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार




गटात प्रवेश करत उमेदवारी मिळवली. त्यामुळे शरदचंद्र पवार गटातील निष्ठावान नेते आणि कार्यकर्ते नाराज झाले आहेत. प्रवीण माने, आप्पासाहेब जगदाळे आणि भरत शहा यांनी बंडाचा पवित्र घेत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले. अपक्ष उमेदवार म्हणून प्रवीण माने यांच्या नावाची चर्चा आहे.

प्रविण माने पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीत उतरत असले तरी त्यांचा चाहता वर्ग भरपूर आहे आणि त्यांच्या मागे असंख्य कार्यकर्ते आहेत. त्यामुळे इंदापूर तालुक्यात विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट), हर्षवर्धन पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट) आणि प्रवीण माने (अपक्ष) अशी तिरंगी लढत होणार आहे.

दर दहा वर्षांनी इंदापूर तालुक्यात बदल घडत असतो. १९९५ साली शरद पवार यांनी गणपत पाटील यांना उमेदवारी दिली होती. त्यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी बंड करत अपक्ष उमेदवारी दाखल केली होती आणि त्या वेळी हर्षवर्धन पाटील निवडून आले होते. १९९५ सालची पुनरावृत्ती २०२४ साली होते का, अशी चर्चा इंदापूर तालुक्यात रंगू लागली आहे.

पाटील व माने यांच्यात मराठा समाजातील मते विभागली जातील, तर भरणे यांच्या पाठीशी धनगर समाज कायम उभा राहील. त्यामुळे यावेळी काय घडते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. इंदापूर तालुक्यातील मतदार कोणत्या उमेदवाराच्या पारड्यात मातदान रुपी आशीर्वाद देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी निवडणूक रंगतदार आणि चुरशीची होणार हे मात्र नक्की.

**मतदारसंख्या–३,३६,८००**

**२०१४**
**विजयी उमेदवार: दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस)**
**पराभूत उमेदवार: हर्षवर्धन पाटील (काँग्रेस)**
**मताधिक्य: १४,१७३**

**२००९**
**विजयी उमेदवार: हर्षवर्धन पाटील (काँग्रेस) पराभूत उमेदवार: दत्तात्रय भरणे (अपक्ष)**
**मताधिक्य: ७,९६०**

**२०१९**
**विजयी उमेदवार: दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस)**
**पराभूत उमेदवार: हर्षवर्धन पाटील (भाजप)**
**मताधिक्य: ३,११०**

# ॲड.ड.पी.डी.काटकर यांच्या कविता संग्रहास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

स्वदेशी साहित्य संमेलन-२०२४ अंतर्गत काव्य विभागात मोठ्या गटात ड.पी.डी.काटकर यांच्या कळा या लागल्या जीवा या काव्यसंग्रहाची नुकतीच राज्यस्तरीय प्रथम पारितोषिकासाठी निवड करण्यात आली आहे.

हुतात्मा राष्ट्रबंधू राजीव भाई दिक्षित यांच्या जयंती व पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून स्वदेशी साहित्य संमेलन-२०२४ तर्फे काव्य ग्रंथ पुरस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नागभीड तालुक्यातील जनकापूर येथील कवी ड.पी.डी.काटकर यांच्या कळा या लागल्या जीवा या काव्यसंग्रहास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिकासाठी निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा ३० नोव्हेंबर रोजी आसू, ता. फलटण, जि. सातारा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यात ड.पी.डी.काटकर यांना सन्मानित करण्यात येणार आहे. याबाबतचे कार्यक्रम समन्वयक प्रकाश संकुले यांचे पत्र ड.पी.डी.काटकर यांना प्राप्त झाले आहे.

# वैजापूरमध्ये महायुती उमेदवार रमेश पाटील बोरणारे यांची जन आशीर्वाद यात्रा

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यात महायुतीचे उमेदवार रमेश पाटील बोरणारे यांच्या दौऱ्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. २० ऑक्टोबर रोजी त्यांनी वडजी, नारळा, भिंगी, पानगव्हाण, अंचलगाव व लोणी खुर्द या गावात जन आशीर्वाद यात्रा आयोजित केली.

यावेळी आमदार बोरणारे सर यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत विचारले, आतापर्यंत तुमच्या गावात जे कामे झाली, त्या कामाबद्दल तुम्ही नाराज आहात की खुश? यावर प्रत्येक गावातील जनतेने विश्वासाने उत्तर दिले की, पाच वर्षात तुम्ही केलेल्या कार्याबद्दल आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवून आहोत आणि यापुढेही तुमच्यासोबत राहू.

तसेच, या गावातील तरुणांनी महायुतीचे उमेदवार रमेश पाटील बोरणारे यांच्या पक्षात प्रवेश केला, यामुळे त्यांच्या दौऱ्यात आणखी उत्साह वाढला. गावकऱ्यांच्या विश्वास आणि समर्थनामुळे बोरणारे यांची उमेदवारी अधिक बळकट झाली आहे.




# भाजपची पहिली यादी जाहीर, शेवगावच्या मोनिका राजळे यांचे नाव जाहीर दिवटे गावामध्ये भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष

**दिवटे । सुधीर जावळे**

भारतीय जनता पक्षाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी पहिली उमेदवार यादी जाहीर केली आहे. या यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेवगाव पाथर्डी साठी विद्यमान आमदार मोनिका राजळे यांच्यावर विश्वास टाकत तिसऱ्यांदा निवडणूक लढवण्याची संधी देऊन त्यांचे उमेदवारीसाठी नाव जाहीर केले.

मोनिका राजळे यांच्या नावाची घोषणा होताच दिवटे गावामध्ये भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. यावेळी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब गोल्हार, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष राजूभाऊ डमाळे, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दिगंबर कणसे, माजी उपसरपंच परमेश्वर जावळे, सुनील कणसे, गणेश जावळे, ग्रामपंचायत सदस्य शहादेव



जावळे, युवराज कणसे, किशोर कणसे, संदीप कणसे आदी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

गेल्या अनेक दिवसांपासून महायुतीमध्ये २८८ जागांच्या वाटपावर चर्चा चालू आहे. जवळपास सर्वच जागा वरील चर्चा निकाली लागली आहे. असे असताना आज भाजपने एकूण ९९ जागांसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. तुलनेने सुरक्षित असलेल्या जागांचा भाजपने आपल्या पहिल्या यादीत समावेश केला आहे. या यादीत शेवगाव पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे यांच्या नावाचा समावेश केल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.

# काकांनी जागतिक पातळीवर आदिवासीचा आवाज बुलंद केला

## साहित्यिक वाहरू सोनावणे यांचे गौरवोद्गार

**पालघर । प्रतिनिधी**

भूमिसेना आणि आदिवासी एकता परिषदेद्वारे आयोजित अभिवादन सभेत साहित्यिक वाहरू सोनावणेंनी काळुराम काकांचे गौरवोदगार केले. काकांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

काळुराम काकांचा आदिवासी, दिन, दलित, शोषित आणि पीडित समाजावर प्रकाश टाकणारा विचारांचा वसा आणि स्वार्थ म्हणजे समाजहित असलेले जीवन आहे. काकांनी युनोच्या सभेत जागतिक पातळीवर आदिवासींचा आवाज उठवला, यामुळे त्यांनी समाजाला एक नवा दिशादर्शक दिला.

सोनावणे म्हणाले की, आदिवासी चळवळीची विचारधारा, संस्कृती आणि चळवळ यापुढेही काकांच्या कार्यातून दिसून येतील. काका साहित्य आणि



काव्यातूनही बोलतील. यावेळी काकांच्या विचारांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी करण्यात आली.

काकांचे विचार व्यक्त करताना सोनावणेंनी सांगितले की, ना लोकसभा ना विधानसभा, सर्वोच्च स्थान ग्रामसभा आहे, परंतु भांडवलशाही नात्यांमुळे या ग्रामसभा ढासळत आहेत. ठेकेदार सदस्यांना खरेदी करत आहेत. या विषमतेमुळे संघर्ष सुरू राहील.

काकांचे विचार आणि कार्य वारसदार बनण्याचे प्रेरणादायी कार्य करण्याची आवश्यकता आहे, असे सोनावणेंनी स्पष्ट केले. यावेळी मीनाताई धोदडे यांनी काकांच्या सर्वसमावेशक विचारधारेबद्दल आपले विचार व्यक्त केले.सभेची सुरुवात धरती गीताने करण्यात आली. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले, ज्यात दत्ता करबट, अशोक ठाकरे, नीता काटकर, प्रवीण राऊत यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. सभेचे नियोजन पिंट्या मानकर, रुपेश धांगडा, आणि अमोद जाधव यांनी केले.

# बँक ऑफ महाराष्ट्र शाखा केळझरसेवेसाठी वाढती गर्दी, पण कर्मचारी कमी




**केळझर । आकाश नरताम**

गेल्या तीन महिन्यांपासून लोकांची गर्दी बँक ऑफ महाराष्ट्राच्या केळझर शाखेत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तरीही, यावर प्रभावी उपाययोजना करण्यास बँक व्यवस्थापनाकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे. शाखेत फक्त तीन कर्मचारी कार्यरत आहेत, जेव्हा एक व्यक्ती पाचबुकाची एंट्री करण्यासाठी येतो, तेव्हा एंट्री बंद असा बोर्ड लावला जातो.

केळझर ही एक मात्र सरकारी बँक असून, येथे एकट्या केळझरच्या वडगांव, जुनगड, गायमुख, आमगांव, नवरगाव, खडकी, सेलडोह, महाबळा, किनाळा, दहेगाव या गावांचे खातेधारकही मोठ्या त्रासात आहेत. एटीएममध्ये कधी पैसे असतात, तर कधी नसतात, आणि एसी लावली तरी ती फक्त बघण्यासाठी असते. यामुळे लोकांच्या वतीने यावर लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

काही खातेदारांशी संवाद साधल्यानंतर त्यांनी सांगितले की, आम्ही ११ वाजता बँकेत आलो, पण २ वाजता आले तरी आमचे काम पूर्ण झाले नाही. यावरून बँकेची लापरवाही स्पष्टपणे दिसून येते. जर या समस्यांवर लवकरात लवकर लक्ष दिले नाही, तर ग्राहकांमध्ये संताप होण्याची शक्यता आहे.

तरीही, बँक व्यवस्थापनाने या गंभीर समस्यांकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा, ग्राहकांच्या संतोषात कमी येण्याची शंका नकोच.


# सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्यास उपस्थित राहा-नारायण अंकुशे

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या ७५ वर्षापासून देशातील आजी-माजी सैनिकांचा उपयोग फक्त मतापुरताच केला आहे. सैनिक आणि शहीद सैनिक परिवाराला त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे.

अशा विविध समस्याला वाचा फोडण्यासाठी आणि न्याय देण्यासाठीसैनिक महामेळावा आणि सैनिक रत्न पुरस्कार वितरण समारंभ आयोजन परिवर्तन महाशक्तीच्या घटक पक्ष भारतीय जवान किसान पार्टी ने दिनांक २१ ऑक्टोबर. २०२४ रोजी पुण्यातील बालगंधर्व नाट्यगृहात सकाळी ११ वाजता आयोजित केल्या असल्याची माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, या सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्याला छत्रपती संभाजी महाराज मा मंत्री बच्चू कडू,माजी खा राजू शेट्टी,माजी आ वामनराव चटप माजी आ शंकरराव धोंडगे या मान्यवरांच्या शुभ हस्ते वितरण होणार असून सैनिकाच्या समस्या आणि उपाययोजना यावर उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाची रूपरेषा ११ वाजता मान्यवराच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात. यानंतर उपस्थित मान्यवर यांच्या बरोबर चहा पाण्याचा कार्यक्रम. ११.३० हस्ते सैनिक रत्न पुरस्कार वितरण. १२ ते ०३ सैनिकांच्या समस्या विषयी उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन.०३ वाजता राष्ट्रगान गाऊन कार्यक्रमाची सांगता ०३-३० वाजता उपस्थित मान्यवरासह स्नेहभोजन अशी असुन दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी अकरा वाजता पुणे येथील बालगंधर्व नाट्यगृहात आजी-माजी सैनिक शहीद सैनिक परिवार असंघटित कामगार आणि माता भगिनींनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आव्हान आयोजक नारायण अंकुशे यांनी केले आहे



# वाचन प्रेरणा दिन साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जनाची जिज्ञासा निर्माण करता येते -मुख्याध्यापक , सुभाषरावजी डख

**मानवत । प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन नेताजी सुभाष शिक्षण संस्थाच्या , नेताजी सुभाष विद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील साजरा करण्यात आला.

यानिमित्त विद्यालयाच्या वतीने वाचन प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनी मध्ये व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास या विषयांची पुस्तके वाचन करण्यास वाचन प्रकल्पा मध्ये ठेवण्यात आली होती.यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भाग घेतला या वेळी वाचन प्रकल्पाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाषराव डख यांनी केले.उद्घाटन प्रसंगी मुख्याध्यापक सुभाषरावजी डख यांनी डॉ. कलाम हे एक अतुलनीय वाचक होते. त्यांनी वाचन केवळ ज्ञानार्जनच नव्हे तर आपल्या स्वप्नांना साकार करण्याचे साधन म्हणून वापरले. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करणे हे त्यांच्या या गुणवत्तेला उजळणी देणारे आहे.डॉ.



कलाम यांनी नेहमीच ज्ञानार्जनाचे महत्त्वावर भर दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जनाची जिज्ञासा निर्माण करता येते.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय निर्माण करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे. या प्रकारच्या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगता येते, असे विचार मांडले.कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते.या प्रसंगी बालाजी गोंटे अशोक पांढरे, एस. एन कच्छवे, सुरेखाताई चंदाले, संगीताताई थोरे , एकनाथ मुळे, अनिल चव्हाण, श्रीमती सोनालीताई माने आदींची या वेळी उपस्थिती होती.

# दिपकआबा साळुंखे पाटील हे महाविकास आघाडीचे सांगोला विधानसभेचे अधिकृत उमेदवार-पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे

## आबांना तुम्ही आमदार करा आम्ही मंत्री करतो ;खा संजय राऊत यांची ग्वाही





**सांगोला । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाविषयी काही राजकीय नेत्यांनी घेतलेली वेगळी भूमिका महाराष्ट्राला अजिबात आवडली नाही. महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यातील अंधःकार जाळण्यासाठी मी आज दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या हातात सांगोला विधानसभेची उमेदवारी जाहीर करून शिवसेनेची धगधगती मशाल देत आहे. दिपकआबा जिल्ह्यातील अंधःकार दूर करून विकासाचा नवीन दिपक घेऊन जिल्ह्याच्या राजकारणात नक्कीच उदयाला येतील असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शुक्रवार दि १७ रोजी शिवसेना ठाकरे गटात आपल्या हजारो समर्थकांसह जाहीर प्रवेश केला. माजी आमदार दिपकआबांचे पक्षात स्वागत करून त्यांची सांगोला विधानसभेची उमेदवारी घोषित करताना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे बोलत होते. यावेळी शिवसेना नेते खा संजय राऊत, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा अनिल देसाई, संपर्क प्रमुख अनिल कोकीळ माजी खा विनायक राऊत, आमदार मिलिंद नार्वेकर, जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे, तालुका प्रमुख अरविंद पाटील कमरुद्दिन खतीब, शहर प्रमुख तुषार इंगळे भारत गवळी आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचे समर्थक पदाधिकारी आणि हजारो प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे म्हणाले, २०१९ रोजी झालेल्या सांगोला विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा उमेदवार म्हणून सांगोलकरांनी ज्यांच्यावर विश्वास ठेवला त्यांनी वेगळी भूमिका घेतली. त्यांना अद्दल घडविण्यासाठी मी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या हातात निष्ठेची आणि परिवर्तनाची मशाल देत आहे मला विश्वास आहे सांगोलकर नक्कीच या मशालीचा प्रकाश सबंध तालुक्यात पसरवतील आणि विरोधकांना कायमस्वरुपी घरी बसवतील असा विश्वास व्यक्त करत आगामी विधानसभा निवडणुकीत माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांची महाविकास आघाडीतून मशाल या चिन्हावर सांगोला विधानसभेचा उमेदवार म्हणून अधिकृतपणे घोषणा केली.

दरम्यान यावेळी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या समवेत ज्येष्ठ नेते तानाजीकाका पाटील शिवाजीराव बनकर मधुकर बनसोडे विजय राऊत विजय येलपले विजय पवार चंद्रकांत चौगुले अनिल खटकाळे नंदकुमार दिघे सतीश काशीद नाथा जाधव सतीश सावंत अनिल साळुंखे शहाजी हातेकर अशोक माने बाबुराव नागणे विजयसिंह खबाले शिवाजी जावीर चंद्रकांत कारंडे संतोष पाटील योगेश खटकाळे अनिकेत सुरवसे अमोल सुरवसे सुरेश गवंड गिरीश पाटील अजित गोडसे विनायक मिसाळ आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह हजारो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला कायमचा जय महाराष्ट्र करून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात जाहीर प्रवेश केला. पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांनी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासह सांगोला तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले.

### लवकरच सांगोलकरांना भेटायला येणार...!

**शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून तो महाराष्ट्रव्यापी परिवार आहे. या परिवारात नव्याने दाखल झालेले महाविकास आघाडीचे उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांचा प्रचारार्थ आपण लवकरच सांगोला तालुक्यातील जनतेशी संवाद साधण्यासाठी येत आहोत असे सूचक विधानही यावेळी पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी केले.**

### तुम्ही आबांना आमदार करा आम्ही मंत्री करतो.

**गेली अनेक वर्ष मी दूर असूनही माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचे काम जवळून पहात आहे त्यांच्या रूपाने सोलापूर जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एक मजबूत शिलेदार मिळाला आहे. आगामी काळात त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात पक्ष आणखी बळकट होईल यात आम्हाला शंका नाही. सांगोलकरांनी दिपकआबा साळुंखे पाटील यांना आमदार करावे आम्ही नक्कीच येणाऱ्या मंत्रिमंडळात त्यांना मंत्री करू असा शब्दही यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी दिला.**

# सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी



**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात तिथीनुसार महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली.या वेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक उदय बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील सहशिक्षिका शुभांगी पवार यांनी महर्षी वाल्मिकी यांनी त्या काळात केलेल्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी रामायण हे मोठे महाकाव्य रचले, आपल्या हातून झालेल्या पापातून मुक्त होण्यासाठी तपश्चयेचा मार्ग अवलंबिला. त्यांनी भारतीय संस्कृती, परंपरा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केला. असे सांगितले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अविनाश दिघे यांनी केले तर आभार इकबाल शेख यांनी मानले. या कार्यक्रमास विदयार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## बायपास मार्ग सुरू तरीही जड वाहने थेट शहरात

# पंढरपूरकरांचा जीव टांगणीला,बांधकाम विभागाने महिन्यापूर्वी दिलेल्या पत्राकडे पोलिसांचे दुर्लक्ष

**पंढरपूर । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन महिन्यापूर्वीच कोर्टी रोड - वाखरी बायपास मार्ग तयार असून अवजड वाहतूक बाह्यवळण मार्गे सुरु करण्यात यावी, असे लेखी पत्र दिल्यानंतरही पंढरपूर शहर पोलिसांच्या दूर्लक्षामुळे अवजड वाहतूक थेट शहराच्या मध्यवर्ती भागात येत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन,अपघाताच्या भीतीने पंढरपूर करांचा जीव टांगणीला लागलेला आहे. विशेष म्हणजे, सामान्य पंढरपूरकर या वाहतुकीविरोधात आपला रोष उघडपणे व्यक्त करीत असतानाही पंढरपूर शहर पोलीस आणि नगरपालिका प्रशासन या वाहतुकीला आळा घालण्याकडे कानाडोळा का करीत आहे, असा सवाल नागरिकाना पडलेला आहे.



पंढरपूर शहराचा विस्तार वाढत असून २० वर्षांपूर्वी जो लिंक रोड आणि बायपास मार्ग काढलेला होता तो मार्ग आता शहराच्या मध्यवर्ती भागात आलेला आहे. यापूर्वी या लिंक रोडवर अनेक अपघात होऊन नागरिकांचे बळी गेलेले आहेत.

१२ ते १६ चाकी अवजड वाहने एकामागून एक पंढरपूरच्या मध्यवर्ती भागातून जात असतात. एवढेच नाही तर असे ट्रक थेट पंढरपूरच्या नव्या पेठेत आणि नगरपालिका, भादुले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरपूर अर्बन बॅन्क या परिसरात येत आहेत. त्यामुळे अगोदरच अरुंद असलेल्या मार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. अगोदरच पंढरपूर शहरातील रस्ते अरुंद आहेत, त्यातच रस्त्यावर व्यापाऱ्यांची आणि फेरीवाल्यांची अतिक्रमणे आहेत. नव्या पेठेत शेकडो भाजी विक्रेते रस्त्यावर बसून रास्ता व्यापून टाकतात, तरीही अवजड वाहने थेट गावात येतात. क्रांतिसिंह नाना पाटील चौक, जुना सोलापूर नाका, नागालँड चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक या भागात वाहतुकीची कोंडी सतत होत असते. पोलीस प्रशासन या अवजड वाहतुकीकडे मात्र कानाडोळा करीत आहेत. त्यामुळे पंढरपूरकर नागरिकातून नाराजी व्यक्त होत आहे.वाहने बाहेर वळवणे अशक्य, व्यापाऱ्यांना सूचना करणार सार्वजनिक बांधकाम विभागास वाहतूक वळवण्याचे फलक लावणे, हाईट बॅरिकेड्स लावण्याची सूचना केलेली आहे, शिवाय पालखी महामार्गाच्या बायपासचे काम अपूर्ण आहे, ते कार्तिकी पूर्वी पूर्ण करण्याची सूचना हायवेला केलेली आहे. त्याशिवाय अवजड वाहतूक बाहेरून वळवता येणे अशक्य आहे. शहरातील अवजड वाहतुक होऊ नये. कार्तिकी नियोजन बैठकीत व्यापाऱ्यांना सूचना देण्यात येतील. - अर्जुन भोसले , उपविभागीय पोलिस अधिकारी

# आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या ४८ तासात जिल्ह्यातील २४ हजार ९६९ जाहिराती काढल्या

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासूनच्या ४८ तासामध्ये जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, घोषणा फलक, रंगविलेल्या जाहिराती, कोनशिला, झेंडे काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसरातील ११ हजार ६४१, सार्वजनिक ठिकाणच्या ९ हजार ५०२ तर खाजगी मालमत्तेवरील ३ हजार ८२६ अशा एकूण २४ हजार ९६९ जाहिराती काढण्यात आल्या असल्याची माहिती आचारसंहिता कक्षातर्फे देण्यात आली आहे. अकोले विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८६४, सार्वजनिक ठिकाण ३९१ तर खाजगी मालमत्तेवरील ३२० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.





संगमनेर मतदारसंघ कार्यालय परिसर ८१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ८८, खाजगी मालमत्तेवरील २५५, शिर्डी मतदारसंघ कार्यालय परिसर ९१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ६४१, खाजगी मालमत्तेवरील ३५१, कोपरगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ९५४, सार्वजनिक ठिकाण ६१९, खाजगी मालमत्तेवरील ३०९, श्रीरामपूर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १३१, सार्वजनिक ठिकाण १ हजार ५५० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.

नेवासा मतदारसंघ कार्यालय परिसर ३२४, सार्वजनिक ठिकाण ५७७, शेवगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ८५४, सार्वजनिक ठिकाण ९३७, खाजगी मालमत्तेवरील १ हजार ७२३, राहुरी मतदारसंघ कार्यालय परिसर २५४, सार्वजनिक ठिकाण १४१, खाजगी मालमत्तेवरील २१, पारनेर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १२३, सार्वजनिक ठिकाण ९७८, खाजगी मालमत्तेवरील ४९५ जाहिराती काढण्यात आल्या. अहमदनगर शहर मतदारसंघ कार्यालय परिसर २८६, सार्वजनिक ठिकाण ४१६, खाजगी मालमत्तेवरील ४१, श्रीगोंदा मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार २९४, सार्वजनिक ठिकाण ८०२, खाजगी मालमत्तेवरील ३११ तर कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८२५, सार्वजनिक ठिकाणच्या ३६२ जाहिराती काढण्यात आल्या असल्याचे आचारसंहिता कक्षातर्फे कळविण्यात आले आहे.

# व्यापाऱ्यांना ठामपणे संरक्षण देण्याचं काम मी केले कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊ द्या

## जो पर्यंत सर्वसामान्य माणूस माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही–सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

माझ्याकडे या मतदार संघाचा डेवोलपमेंट प्लॅन आहे सुजलाम सुफलाम हा मतदार संघ करण्याचा माझा पहिल्या पासून माणसं आहे.तुम्ही संधी दिल्यास हे सर्व मी करून दाखविणार आहे.कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊद्या जो पर्यंत गोरगरीब,सर्वसामान्य जनता माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही म्हणत आ.सुरेश धस यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत.गुरुवारी शहरातील मोरेश्वर लॉन येथे आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील व्यापारी बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष संजय मेहेर शिरूर नगराध्यक्ष रोहिदास पाटील,मधुसूदन खेडकर,डॉ.बडजाते,अभिजीत डूगरवाल,फैयाज भाई,अशोक तळेकर,गोरख कर्डिले,संतोष भंडारी,संपत शेळके,नागेश कर्डिले,हरून शेठ,शहादुला बेग,हेमंत पोखरणा,योगेश भंडारी,दर्शन कांकरिया,रतिलाल कटारिया,कल्याण भोसले,अजित बोरा यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना धस म्हणाले की,ज्या वेळी कडा बाजारपेठ माझ्या ताब्यात आली त्या वेळी साधं पोताड्याच हॉटेल असणार कडा मार्केट आज त्या मार्केटचा कांदा दुबईला जात आहे.परळी येथे खत साठा करायचे रॅक होते.ते अहील्यानगराला आणण्याचे काम मी केले.त्यामुळे वाहतूक कमी होऊन व्यापाऱ्यांना ते सोयीस्कर मिळण्यास मदत झाली.खताचा पुरवठा वारंवार आपल्याला कमी मिळत होता त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून तो पुरवठा व्यवस्थित करण्यासाठी प्रयत्न केला.आज एकही कृषी दुकानदाराची खताच्या कमतरतेबाबत तक्रार नाही.व्यापाऱ्यांमध्ये किमान ८ दिवसातून एकदा बसून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतो त्याच निरसन करण्याचं काम करतो.आयुष्यात मदत करताना कधीच हिशोबाची डायरी ठेवली नाही.म्हणूनच लाखोंनी माणसं जोडत गेली.ती आजही सत्ता असो अथवा नसो ती कायम माझ्यासोबत आहेत हीच माझी संपत्ती असल्याचे सांगत मच्छिंद्रनाथ गडावर २१ कोटी रुपयांची विकास काम सुरू आहे.त्याचा कायापालट करण्याचं काम मी केलं.देवस्थानाला १९ एकर जमीन होती आता १५० एकर जमीन झाली.आष्टी तालुक्यात सव्वादोन टीएमसी पाणी मी आणून दाखविले आहे.वेळ आली की ते पुराव्यासह तुमच्यासमोर सिध्द करून दाखवणार आहे.५८ टी एम सी जे पाणी आलेलं आहे ते भविष्यामध्ये पाटोदा आणि शिरूर तालुक्याला वळवणार हा प्रामाणिकपणे शब्द तुम्हाला देतो म्हणत माझा मोबाईल दिवस रात्र माझ्या जवळ असतो कारण कधी कुणाची काय अडचण असेल ती सांगता येत नाही परंतु एक सांगतो ज्या दिवशी मोबाईल बंद करील हॉल मध्ये ठेवीन त्या दिवशी मी माझ राजकारण बंद करीन.रात्रंदिवस झटाव लागतं तेव्हा माणसं जमतात.स्वतःच्या स्वार्थासाठी काही जण जातीपातीचे राजकारण करू पाहत आहेत ही जनता माझ्या पाठीशी आहे तो पर्यंत मी कशालाच घाबरत नाही असे शेवटी धस म्हणाले.यावेळी हजारो व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माजी नगरसेवक नाना बागुल आणि सिंधी समाजाचे नेते नंदलाल वाधवा यांचा रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश-रामदास आठवले



**दैनिक राज आनंद । मुंबई । प्रतिनिधी**

आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल यांनी आज आपल्या समर्थकांसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) या पक्षात आज जाहिर प्रवेश केला.तसेच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी ही आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) या पक्षात जाहिर प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा आज मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ,ठाणे प्रदेश निरिक्षक सुरेश बारशिंग, युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, प्रसिद्धी प्रमुख हेमंत रणपिसे, महिला आघाडी राज्य अध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे , उषाताई रमलू , आशाताई लांडगे, अभयाताई सोनवणे, माजी नगरसेवक नाना बागुल, सिंधी समाज ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा,

आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री ना .रामदास आठवले यांच्या शुभहस्ते माजी नगरसेवक नाना बागुल आणि नंदलाल वाधवा यांचे पुष्पगुच्छ देऊन रिपब्लिकन पक्षात स्वागत करण्यात आले. माजी नगरसेवक नाना बागुल हे उल्हासनगर मधील आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते आहेत.यांचा राजकीय, सामाजीक आणि प्रशासकीय प्रदीर्घ अनुभव आहे.उल्हासनगर आणि ठाणे जिल्हातल्या राजकारणात एक मातब्बर नेते आहेत.त्यांच्या कुंटुंबात त्यांच्या पत्नी आणि मुलगा नगरसेवक आहेत.उल्हासनगरच्या राजकीय घडामोडींचा त्यांना प्रंचड अनुभव आहे.या पूर्वी त्यांनी रिपब्लिकन पक्षात जिल्हा अध्यक्ष म्हणुन काम केले होते.भारतीय दलित पँथर पासुन ते आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत.केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर आपला अतुट विश्वास असल्याने आपण रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केल्याचे मनोगत नाना बागुल यांनी यावेळी व्यक्त केले.माजी नगरसेवक नाना बागुल यांच्या पक्ष प्रवेशामुळे उल्हासनगर आणि ठाणे प्रदेश मध्ये रिपब्लिकन पक्षाला बळकटी मिळेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला. सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा हे उल्हासनगर मधील यशस्वी उद्योजक आणि ज्येष्ठ समाजसेवक म्हणुन कार्यरत आहेत.त्यांना ४५ वर्षपेक्षा जास्त उद्योग व्यवसाय आणि सार्वजनिक जिवन यांचा अनुभव आहे.भानुशाली रोलर फ्लोअर मिल,स्वामी शांती प्रकाश गुडस्,आणि मीलन ग्रुपचे ते चेअरमन आहेत.सिंधी समाजासहित सर्व समाजात समाजसेवेचा त्यांना दिर्घ अनुभव आहे.केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचे ते चाहते असल्याने आज त्यांनी रिपब्लिकन पक्षात ना.रामदास आठवले यांचे शुभ आर्शीवाद घेऊन रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केला.

## रवी राणांनी नवनीत राणांना खासदार होऊ दिले नाही

# त्यांनी भाजपच्या सर्व लोकांशी वाद घातला विधानसभेला काय होते पहा–बच्चू कडू

**अमरावती (वृत्तसंस्था)**–नवनीत राणा यांना खुद्द रवी राणा यांनी खासदार होऊ दिले नाही. नवनीत राणा या खासदार होऊ नये, याला रवी राणा हेच जबाबदार आहेत. एखाद्याला निवडणूक लढायची असते तेव्हा सगळ्यांना समजून घ्यायला हवे, असे म्हणत माजी मंत्री बच्चू कडू यांनी राणांना टोला लगावला आहे.

बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, रवी राणा यांनी अमरावतीमधील भाजपच्या सर्वच नेत्यांशी वैर घेतले होते. त्यांच्याशी वाद घातला होता. त्यामुळेच नवनीत राणा यांचा पराभव झाला. आता विधानसभेला काय होते ते बघा, असा इशाराही कडू यांनी दिला आहे.

बच्चू कडू म्हणाले की, ओबीसी मराठा वाद जाणीवपूर्वक लावला गेला आहे. भाजजपने भाजपनेच मराठा विरुद्ध ओबीसी वाद लावला ही वस्तुस्थिती आहे, अशी टीका अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. गरज सरो वैद्य मरो ही भाजपची भूमिका कायम राहिलेली आहे. भाजप सगळ्यांसोबत अशीच वागली आहे, असे अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावर बोलताना बच्चू कडू यांनी म्हटले आहे.बच्चू कडू म्हणाले की, सामान्य माणसाला आपले वाटेल असे सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न आम्ही करू. आम्ही चांगले उमेदवार देणार आहोत. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसले परिवर्तन आणणार आहात? तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसे काय परिवर्तन तुम्ही आणणार आहात? असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला.बच्चू कडू म्हणाले की, परिवर्तनाचा अधिकार महायुतीलाही नाही आणि महाविकास आघाडीलाही नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला आहे. नवीन परिवर्तन हे खऱ्या अर्थाने कामाचे असेल, बजेटमधील हिस्सा हा सामान्य माणसाचा असेल, असे बच्चू कडू म्हणाले.

## तिसऱ्या आघाडीच्या इच्छुकांच्या मुलाखती सुरू:पुण्यातील स्वराज्य पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात इच्छुकांची गर्दी

**पुणे (वृत्तसंस्था)**–आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांना शह देण्यासाठी परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडी निर्माण करण्यात आली आहे. ही आघाडी राज्यातील सर्व मतदारसंघात उमेदवार उभे करणार असल्यामुळे आता छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज पक्षाकडे इच्छुकांच्या रांगा लागल्या आहे. यामध्ये ३ जिल्हाप्रमुख, ३ माजी महापौर, ६ जिल्हापरिषद सदस्य, १ जिल्हापरिषद सभापती, १ पंचायत समिती सभापतीसोबत आपचा युवक प्रदेशाध्यक्ष प्रवेशासह उमेदवारीसाठी आग्रही असल्याचे दिसून आले आहे.

संभाजीराजे यांच्या स्वराज्य पक्षाचे पुण्यातील शिवाजीनगर येथे मध्यवर्ती कार्यालय आहे. स्वराज्य भवन नामक या कार्यालयात मुलाखतीसाठी इच्छुक उमेदवारांची गर्दी होत आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे, सरचिटणीस धनंजय जाधव, आप्पासाहेब कुढेकर, प्रशांत पाटणे, विनोद साबळे यांनी या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नांदेडचे जिल्हाप्रमुख विश्वंभर पवार यांच्यासह इतर जिल्ह्यातील, शिवसेना शिंदे जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख,आम आदमी पक्षाचे जिल्हाप्रमुख या पक्षांचे प्रत्येकी एक असे ४ जिल्हाप्रमुख संभाजीराजेंना उमेदवारीसाठी मुलाखती देण्यास आले होते.तसेच नाशिकचे माजी महापौर दशरथ पाटील



यांच्यासह इतर शहरातील तीन माजी महापौर उमेदवारी साठी भेटून गेले आहेत. भाजपचे २ जिल्हा परिषद सदस्य व एक जिल्हापरिषद सभापती, शिवसेनेचे दोन जिल्हा परिषद सदस्य, राष्ट्रवादीचे दोन जिल्हा परिषद सदस्य उमेदवार मागण्यासाठी स्वराज्य भवनात आले होते. भूम परंडा मतदारसंघातील सहकार क्षेत्रातील एक नेते देखील स्वराज्यच्या वाटेवर आहे. आम आदमी पक्ष केजरीवाल यांच्या पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांनी देखील संभाजीराजे यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली आहे.पुणे जिल्ह्यातील खेड राजगुरूनगर पंचायत समितीचे माजी सभापती अंकुश राक्षे यांनी देखील उमेदवारी मागण्यासाठी स्वराज्य भवनात राजेंची भेट घेतली. विविध पक्षांचे तालुका प्रमुख व माजी नगरसेवक देखील प्रवेशासाठी स्वराज्य भवनात सध्या येत आहेत.

# सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत–राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

## शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्याचा विविध क्षेत्रात विकास करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. कृषी, सिंचन ,शैक्षणिक, औद्योगिक, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पर्यटन क्षेत्रासह अन्य क्षेत्रात सर्वांगीण विकास घडवून आणून त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळवून द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात आयोजित जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी यांच्या आढावा बैठकीत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, सोलापूर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणासह विविध मोठे, माध्यम व लघु पाणी प्रकल्पाची माहिती घेतली. जिल्ह्यातील सिंचनाखालील क्षेत्राची माहिती घेऊन त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध पिकांविषयी जाणून घेतले. तसेच जास्तीत जास्त सिंचन सुविधा उपलब्ध केल्यास शेतकरी वर्गाला त्याचा लाभ मिळेल, असे त्यांनी सांगितले.जिल्ह्यातील आरोग्य सुविधांची माहिती घेताना सर्वसामान्य रुग्णांसाठी शासकीय रुग्णालयामधील एमआरआय, सीटी स्कॅन मशीन, एक्स–रे यासह अन्य यंत्रणा व्यवस्थितपणे सुरू असली पाहिजे यासाठी संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी. या मशीन वेळोवेळी दुरुस्त करण्यासाठी आवश्यक तरतूद करून ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत रुग्णांना अत्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी वर्गाची असल्याचे निर्देश राज्यपाल श्री राधाकृष्णन यांनी दिले.पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विकास कामांची माहिती घेतली. भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सूचित केले.

सोलापूर महापालिकेच्या कामकाजाचा आढावा घेताना



उजनी धरणातून सोलापूर शहराला नियमित पाणीपुरवठ्यासाठी सुरु असलेल्या कामाचाही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी आढावा घेतला. तसेच महापालिकेला करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाविषयी त्यांनी माहिती जाणून घेतली. तसेच पोलीस विभाग जिल्ह्यात शांतता ठेवण्यासाठी राबवत असलेल्या विविध उपाय योजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली.प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याच्या विविध विकासात्मक कामाची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे सादर केली. यामध्ये जिल्ह्याची सर्वसामान्य माहिती, कृषी, आरोग्य, सिंचन, पाणी प्रकल्प, तीर्थक्षेत्र विकास आराखडा, पर्यटन आराखडा आरोग्य, शैक्षणिक तसेच पारधी समाजाच्या वंचित नागरिकांना मतदार कार्ड वाटप आदी बाबत माहिती दिली. तसेच महापालिका आयुक्त श्रीमती उगले तेली यांनी हे महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध योजनांचे सादरीकरण यावेळी केले. शहर पोलीस आयुक्त राजकुमार यांनी शहरी भागातील तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ग्रामीण भागातील पोलीस विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. त्याप्रमाणेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. महानवर यांनी विद्यापीठाच्या वतीने राबवण्यात आलेले विविध अभ्यासक्रमाची माहिती सादर केली. तसेच विद्यापीठास शैक्षणिक उपक्रम राबवताना येत असलेल्या अडचणीची माहिती देऊन त्या सोडवण्याबाबत सहकार्य करण्याची मागणी केली.याप्रसंगी उद्योजक, वकील, आय एम ए, संपादक व अन्य मान्यवरांशी संवाद साधला.